cmyk

**संपादकीय**

**लोकशाहीसाठी प्रश्न निकाली काढावाच लागेल!**

एकाच घरात हजारो मतदार आढळणे, घर क्रमांक नसणे, एका मतदाराचे नाव अनेक ठिकाणी असणे, वयात घोळ असणे अशा अनेक तक्रारी विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाकडे केल्या. निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ कोण हाताळते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

पुणे – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७९ | सोमवार, दि.२७ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक नामकरण

छत्रपती संभाजीनगर : औरंगाबाद शहराचे छत्रपती संभाजीनगर असे नामांतर होऊनही रेल्वेस्थानकावर मात्र औरंगाबाद रेल्वेस्थानक अशीच पाटी होती. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून आता स्थानकाच्या नाव बदलाला मंजुरी मिळाल्यानंतर स्थानकावरील औरंगाबाद नावाचे सर्व फलक पुसून काढत त्यावर छत्रपती संभाजीनगर रेल्वेस्थानक असे नाव लिहिले जात आहे. औरंगाबाद रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'छत्रपती संभाजीनगर' रेल्वे स्थानक असे करण्यात आले आहे. या स्थानकाचा नवीन स्थानक कोड कॅप्शन असा असेल. त्यामुळे औरंगाबाद रेल्वे स्थानकास आता पुढे छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक या नावाने ओळखले जाईल.

### जैन बोर्डिंग प्रकरणात उपमुख्यमंत्र्याची इंट्री

पुणे : पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरण चांगलेच तापले आहे. शिंदे गटाचे नेते तथा माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी हे प्रकरण चांगलेच लावून धरले आहे. विशेष म्हणजे त्यांनी धंगेकर यांनी येत्या २७ ऑक्टोबर सोमवारपासून जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द होईपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचा या खरेदी प्रकरणात सहभाग असल्याचा दावा केला आहे.या मुद्याचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर परिणाम पडण्याची शक्यता असल्याचे लक्षात येताच भाजपाने सावध पवित्रा घेतला आहे. शिंदे यांनीदेखील हा विषय संपला असल्याचे सांगितले आहे.

### मुंडेंचे नाव आणि पंकजा–धनंजयची लायकी

बीड : बीडच्या राजकारणात सध्या वेगळे वळण आल्याचे पाहायला मिळत असून महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांचे वारसदार कोण? असा प्रश्न सध्या चर्चेत आलेला आहे. यावर आता मुंडे कुटुंबीयांचे नातेवाईक असलेल्या सारंगी महाजन यांना देखील प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी गोपीनाथ मुंडे यांचे नाव घेण्याची पंकजा–धनंजयची लायकी नसल्याचे विधान केले आहे. गोपीनाथ मुंडे यांचे खरे वारसदार त्यांचे कार्यकर्ते आणि बीडमधील जनता आहे. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे बहीण भाऊ केवळ जमिनी लाटण्यासाठी एकत्र आले असून त्यांनी माझी देखील जमीन लाटली असल्याचा आरोप महाजन यांनी केला.

### सलमानचे नाव दहशतवाद्यांच्या यादीत

मुंबई– बॉलिवूडचा भाईजान सलमान खान बलुचिस्तानवरील त्याच्या अलिकडच्या विधानांमुळे वादात सापडला आहे, या विधानामुळे संपूर्ण पाकिस्तानमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वेगवेगळ्या वृत्तांनुसार, पाकिस्तान सरकारने सलमान खानला दहशतवादविरोधी कायदा (१९९७) च्या चौथ्या अनुसूची अंतर्गत ठेवले आहे. ही यादी दहशतवादात सहभागी असल्याचा संशय असलेल्या व्यक्तींसाठी राखीव असते.मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तान सरकारने सलमान खानचे नाव त्यांच्या चौथ्या अनुसूचीमध्ये समाविशिष्ट केले आहे, ही यादी सामान्यतः अतिरेकी संघटना किंवा दहशतवादी क्रियाकलापांशी संबंध व्यक्तींसाठी राखीव असते.

### स्वदेशी खरेदीला प्राधान्य द्या–पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली : पंतप्रधानांच्या रेडिओ कार्यक्रम 'मन की बात'चा १२७ वा भाग प्रसारित करण्यात आला. पंतप्रधानांनी छठपूजेच्या शुभेच्छा दिल्या आणि लोकांना या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. मन की बातमध्ये पंतप्रधान मोदींनी जीएसटी बचत महोत्सव, सरदार पटेल यांची १५० वी जयंती असून यात सहभागी होण्याचे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले आहे.पंतप्रधान म्हणाले की यावर्षी सणांच्या काळात जीएसटी बचतीचा आनंद साजरा करण्याबाबत लोकांमध्ये उत्साह होता. बाजारपेठांमध्ये स्वदेशी वस्तूंच्या खरेदीत प्रचंड वाढ झाली आहे.

### इतका लबाड मुख्यमंत्री देशाने पाहिला नाही

अमरावती : शेतक–यांच्या कर्जमाफीसाठी अभ्यास सुरू आहे असे म्हणणा–या मुख्यमंत्र्यांना आपण सर्वजण चार–चार पुस्तके पाठवून देऊ. अजूनही कर्जमाफीचा मुहूर्त काढायला बामणाची वाट पाहत आहात का? तुम्हाला मिळत नसेल तर यूपीमधून एखादा बामन आणून देतो, पण शेतक–यांची लगेच कर्जमाफी करा. अशा शब्दात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. काल रात्री सांगोला तालुक्यातील घेरडी येथे शेतक–यांचा आसूड मेळावा घेण्यात आला होता. त्यावेळी कडू बोलत होते.

# नाफेडच्या निकषांमुळे शेतकरी, उत्पादक कंपन्यांची गोची

**पुणे । प्रतिनिधी**

**या हंगामात हमीभाव खरेदी केंद्र मिळण्यासाठी सध्या शेतकरी उत्पादक कंपन्यांची धडपड सुरु आहे. अनेकजण महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालयात नाफेडचा प्रस्ताव सादर करण्यासाठी गेले असता नव्या अटी शर्तींचा सामना करावा लागतो आहे. एफपीओंना खरेदी केंद्र मंजूर करण्यासाठी मागितलेल्या पात्रतेनुसार, संबंधित संस्थांचा तीन वर्षांचा सरासरी टर्नओव्हर किमान एक कोटी रुपये असणे आवश्यक असल्याने अनेकजण केंद्र मिळण्याच्या स्पर्धेतून बाहेर टाकल्या जात आहेत. या सगळ्यांचा परिणाम शेतकऱ्याच्या कापूस खरेदीवर होऊ शकतो यामुळे या दोघांच्या भांडणांमध्ये शेतकरी चिरडला जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



यावर्षीच्या हंगामात हमीभावाने खरेदी करण्यासाठी तालुका, मोठ्या गावस्तरावर शेतकरी उत्पादक कंपन्यांचे केंद्र नेमणुकीची प्रक्रीया राज्य कृषी पणन मंडळाच्या हातात देण्यात आली आहे. त्यासाठी नव्याने निकष तयार करण्यात आले. या निकषानुसार राज्यातील बहुतांश शेतकरी उत्पादक कंपन्यांसमोर अडचणी तयार झाल्या. एफपीओंचा प्रत्यक्ष व्यवहार पाहता ही अट अव्यवहार्य ठरत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. सध्या या निकषात फक्त १० ते १५ एफपीओच बसू शकतात, असे अंदाज व्यक्त करण्यात येत आहेत. नाफेडने टर्नओव्हर ठरवताना प्रत्यक्ष खरेदीच्या व्यवहाराचा विचार करायला हवा होता. ▶▶ पान २ वर

# दिवाळी स्नेहमिलनातं निवडणुकीची रणनीती ठरवली

## नियमात राहून सत्ता आणायची समोरच्यानं नियम तोडले तर गप्प बसायचे नाही–मंत्री मुंडे



**परळी । प्रतिनिधी**

मला आता पक्षाची सत्ता आणायची आहे. आपण कोणतेही नियम न तोडता काम करायचे आहे, मात्र समोरच्यांनी जर नियम तोडले तर आपण कसे गप्प बसायचे नाही, म्हणून आम्ही देखील निर्णय घेत आहोत, अनेक अपक्षांना आता आपण पक्षात घेत आहोत. बदामराव पंडित, आणि आडसकर , आणि माधव निर्मळ यांना पक्षात घेतले आहे आणि आम्हाला आमचा पक्ष वाढवायचा आहे. आता युती होईल की नाही ते पक्ष ठरवेल. मात्र आम्ही काम करणार आहोत. असं वक्तव्य पंकजा मुंडे यांनी केलं आहे. त्या परळीतल्या हालगे गार्डन येथे आयोजित दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रम प्रसंगी बोलत होत्या. ▶▶ पान २ वर

### मी जरांगे पाटलाच्या विरोधात कधीच नव्हते

आता मागचे सर्व विसरून जा, मी जारांगे पाटील यांच्या विरोधात कधी नाही. जरी ते चार शब्द वाईट बोलले तरी मी ते अंगाला लाऊन घेत नाही. कारण ते काही राजकीय व्यक्ती नाहीत. त्यामुळे एखाद्या समाजाला न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेत असणाऱ्या व्यक्तीबद्दल बोलण्याचा प्रश्नच येत नाही. परंतु त्यांना काही लोक चुकीचे अर्थ दाखवून प्रतिमा हनन करण्याचा प्रयत्न करतात.गुलामीचं गॅझेट,गुलामाची औलाद असं आपण कधीच म्हटलेलं नाही. धनगर आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले उपोषणकर्ते, त्याचबरोबर बंजारा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषणाला बसलेल्या उपोषणकर्त्यांना भेटलो व कायद्याच्या चौकटीत जे शक्य असेल ते प्रामाणिकपणे करण्याचा शब्द आपण सरकारच्या वतीने त्यांना दिला.

# दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

## पूरग्रस्तांना माफ, मात्र इतर विद्यार्थ्यांवर बोजा



**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

राज्यात ओला दुष्काळ जाहीर झाल्याने पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ झाले. इतर विद्यार्थ्यांवर मात्र अतिरिक्त वाढीव शुल्काचा मोठा भार पडणार आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षा शुल्कात पुन्हा एकदा वाढ केली. गतवर्षीच्या तुलनेत परीक्षा शुल्क ५० रुपयांनी वाढले आहे. त्यामुळे पालकांच्या खिशाला चांगलीच झळ पोहोचणार आहे.

राज्यात यावर्षी धो–धो पाऊस बरसला. अनेक भागात अतिवृष्टी होऊन पूरपरिस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या सर्व पार्श्वभूमीवर ▶▶ पान २ वर

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी धनंजय मुंडे आक्रमक

**वडवणी । प्रतिनिधी**

माजी मंत्री आणि परळीचे आमदार धनंजय मंडे यांनी फलटण डॉक्टर तरुणी आत्महत्या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली आहे. महिला डॉक्टरच्या पीडित कुटुंबाची माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी सांत्वन पर भेट घेतलीय. या प्रकरणात प्रशासनाला स्वस्थ बसू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा धनंजय मुंडेंनी यांनी घेतला.त्यासोबतच त्यांनी बीडला दोन चार पुढाऱ्यानी बदनाम केले आता या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशीची मागणी त्यांनी केली



पोलीस आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून हा प्रकार घडलेला आहे, असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं. पीडित कुटुंबातील कोणताही व्यक्ती महिला डॉक्टरनं आत्महत्या केली हे मानायला तयार नाही, असं मुंडे यांनी सांगितलं. ही घटना घडण्यापूर्वी तिने लहान भावाला पीजी करण्यास जात प्रमाणपत्र काढण्यास सांगितले होते. दोन दिवस ▶▶ पान २ वर

# महामार्गासाठी पैसे, पण कर्जमाफीसाठी नाहीत–सुळे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना मदत न करता केवळ पाहणी दौरे करणाऱ्या सरकारवर खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार टीका केली. ''शक्तिपीठ महामार्गासाठी सरकारकडे पैसे आहेत, पण शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी पैसा नाही, ही



महाराष्ट्रातील लाजिरवाणी परिस्थिती आहे,'' असा घणाघात सुळे यांनी केला. त्या संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथे अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित शेतकरी मेळाव्यात बोलत होत्या.

सुळे म्हणाल्या, ''आज कांद्याला भाव नाही, एखादंही पीक फायदेशीर नाही. पवारसाहेब मंत्री असताना भाव पडू दिला नाही, पण या सरकारच्या काळात एकाही पिकाला भाव नाही. सरकार म्हणतं 'दिवाळी गोड करू', पण कोणाची झाली? तुमची असेल, कारण तुम्हाला शक्तिपीठ महामार्ग करायचा आहे. सुळे म्हणाल्या, ''अहिल्यानगर जिल्ह्यात काही जणांचं आमच्यावर फार प्रेम आहे,'' असं सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे राधाकृष्ण विखे पाटील ▶▶ पान २ वर

## अलर्ट;राज्यात पुढील ४८ तास पावसाचा धोका

**पुणे/मुंबई । प्रतिनिधी**

नवरात्र गेली, दसरा गेला आणि आता दिवाळीही गेली. मात्र, राज्यातील पावसाचा जोर कमी होत नाही आहे. ऐन दिवाळीला काही भागात जोरदार पाऊस झाला. आज सकाळपासून काही ठिकाणी पाऊस कोसळत असून ढगाळ वातावरण झाले आहे. त्यामध्येच आता भारतीय हवामान विभागानेही पावसाचा मोठा इशारा दिला. पुढील काही दिवस पावसाचे ढग राज्यावर कायम असणार हे स्पष्ट आहे. पुढील दोन दिवस पुणे शहरासह जिल्ह्यात आणि घाट माथ्यावर जोरदार पावसाची शक्यता वर्तविली असून पुणे वेधशाळेने यलो अलर्ट दिला आहे.

आज वादळी वा–यासह पावसाची शक्यता असल्याने पुणे शहरासह जिल्हा आणि घाट विभागासाठी पुणे वेधशाळेने येलो अलर्ट दिला आहे. ४८ तासांचा अलर्ट मुंबईसह उपनगरांना हवामान विभागाने पावसासह वादळी ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना २०२६ नंतर मोफत वीज देणार–मुख्यमंत्री



**फलटण । । प्रतिनिधी**

### न्याय दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही

साता–यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येबद्दल भाष्य केले. परवा आमची एक लहान बहिण जी डॉक्टर होती, ज्यांचा अतिशय दुर्दैवीपणे मृत्यू झाला. तिने आत्महत्या केली. ही आत्महत्या करताना त्याचे कारणही आपल्या हातावर लिहून ठेवले. पोलिसांनी तात्काळ जे आरोपी आहेत त्यांना अटकही केली. त्यातलं सर्व सत्य हे बाहेर येत आहे. आम्ही कुठल्याही परिस्थितीत आमच्या या लहान भगिनीला न्याय दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, हा देखील निर्णय घेतला आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**आम्ही सुरु केलेल्या योजना कधीच बंद होऊ देणार नाही. जोपर्यत देवाभाऊ, शिंदे साहेब आणि अजितदादा आहेत तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी देत २०२६ नंतर शेतक–यांना ३६५ दिवस दिवसा १२ तास वीज देणार, पाच वर्ष मोफत वीज देणार असे देखील यावेळी फडणवीस यांनी म्हटले आहे. ते सातारा जिल्ह्यातील फलटण येथे बोलत होते. दरम्यान अपात्र महिलांना या योजनेतून वगळण्यासाठी आता सरकारकडून योजनेच्या केवायसीला सुरुवात झाली आहे.**

ज्या कुटुंबांचे आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा ▶▶ पान २ वर

# पंढरपूर टू बीड सोलापूर व्हाया फलटण

## पोलीस ठाण्यात येताच आरोपी बदने ढसाढसा रडला

**सातारा । प्रतिनिधी**

**फलटणमधील डॉक्टर आत्महत्या प्रकरणातील आरोपीचा काल पंढरपुरात शोध घेतला जात होता. निलंबित पीएसआय गोपाळ बदणे याच शेवटचं लोकेशन पंढरपुरात असल्याची माहिती मिळाली होती. शनिवारी रात्री गोपाळ बदणे याचं पंढरपुरात लोकेशन आढळल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर पोलिसांनी कसून शोध घेतला होता, अशातच आता गोपाळ पंढरपुरात होता रात्री उशीरा बदणे फलटण पोलिस ठाण्यात हजर झाला पान हजर होताच तो ढसाढसा रडला**



**तो मी नव्हेच हि भूमिका त्यांनी घेतली असल्याचे समजते.**

डॉक्टर तरूणीच्या आत्महत्या प्रकरणातील आरोपी गोपाळ बदणे दोन दिवसात पंढरपूरहून सोलापूरला गेला होता. मग बीडला घरी जाऊन आल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्याने काल रात्री उशीरा थेट पोलीस चौकीत हजेरी लावली. बदणे सोलापुरच्या काही पोलिसांच्या सोशल मीडियावरून संपर्कात होता, अशी माहिती आहे. बदणेच्या कुटूंबायांना त्याला हजर न झाल्यास नोकरीतून बडतर्फ करणार असल्याचं कळल्यानंतर बदणेला पोलीस चौकीत हजर झाला अशी माहिती आहे. हे यासंबंधीचे वृत्त एका वृत्तवाहिनीने दिले आहे. आरोप असलेल्या पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदणे याने शनिवारी रात्री उशिरा फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात स्वत:हून सरेंडर केलं. रात्री जवळपास साडेबारा वाजता तो पोलीस ठाण्यात हजर ▶▶ पान २ वर

## ही आत्महत्या नव्हे तर 'संस्थात्मक हत्या'-गांधी

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या मृत्यू प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले असून, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी या घटनेला 'संस्थात्मक हत्या' असे म्हटले आहे.साता–यातील घटना कोणत्याही सुसंस्कृत समाजाच्या विवेकाला हादरवून टाकणारी असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले.



इतरांचे दु:ख कमी करण्याची आकांक्षा बाळगणारी एक होतकरु डॉक्टर भ्रष्ट व्यवस्थेतील गुन्हेगारांच्या छळाचा बळी ठरली. गुन्हेगारांपासून जनतेचे रक्षण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७८.५० क्विंटल | २,३०० | २,८१६ | २,५४७ |
| ज्वारी/हायब्रिड: ११४.०० क्विंटल | २,००० | ३,८९० | २,५९९ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : ०.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| उडीद : ११.०० क्विंटल | ३,००० | ५,१५१ | ४,०७५ |
| बाजरी: १६१.०० क्विंटल | २,३२० | ३,५०० | २,७२४ |
| मुग: ०.५० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| सोयाबीन: २६५.५० क्विंटल | ३,४०० | ४,२०० | ३,९६२ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

अग्रलेख

# लोकशाहीसाठी प्रश्न निकाली काढावाच लागेल !

एकाच घरात हजारो मतदार आढळणे, घर क्रमांक नसणे, एका मतदाराचे नाव अनेक ठिकाणी असणे, वयात घोळ असणे अशा अनेक तक्रारी विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाकडे केल्या. निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ कोण हाताळते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. निवडणूक आयोगाने केलेला खुलासा मान्य नसल्याचे त्यांनी सांगितले. त्याचा विचार निवडणूक आयोग सकारात्मक पद्धतीने करेल का? आघाडीने उपस्थित केलेल्या शंकांचे समाधान करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. त्याऐवजी खुलासा केला असा पवित्रा घेऊन म्हणून चुप्पी साधणे शंकांना बळकटी देणारेच ठरू शकेल. यातून आयोग टोलवाटोलवी करतो असा समज जनतेच्या मनात निर्माण होऊ शकेल. गेले अनेक महिने हा मुद्दा राष्ट्रीय स्तरावर देखील तापला आहे. आता तर याबाबत भव्य असा मोर्चा काढला जाणार आहे. यामुळे राज्यातील वातावरण आणखी बिघडण्याची शक्यता आहे त्यामुळे निवडणूक आयोगाने योग्य निर्णय घेत, विविध पक्ष संघटना यांच्यासोबतच जनतेला विश्वासात घेण्याची गरज आहे. राज्यामध्ये शंका कुशंका निर्माण होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाने ठोस पावले उचलावीत अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मतचोरी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक यावरून आरोप-प्रत्यारोपांची राळ उडाली आहे. मतदार याद्यांमधील त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात, अशी मागणी महाविकास आघाडीने केली आहे. व्हीव्हीपॅट मशीन नसतील तर बॅलेट पेपरवर निवडणूक घ्या, अशी पुस्तीही या प्रतिनिधींनी त्यांच्या मागणीला जोडली आहे. आघाडीच्या प्रतिनिधींनी याच मुद्यावर राज्य निवडणूक आयोगाची भेट घेतली. गेले काही महिने या मुद्यावरून उडत असलेल्या गदारोळात आणि मनसेने देखील उडी मारली आहे. उपरोक्त भेटीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे देखील सहभागी झाले होते. या सगळ्यांनी आता मोठा मोर्चा राज्यामध्ये आयोजित केला आहे. खरे तर हा मोर्चा काढण्याची परिस्थिती येणे म्हणजे, निवडणूक आयोग आणि विशेष करून राज्य सरकार यांची नामुष्की दाखविणारा आहे. यामुळे सामान्य जनतेमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण होत आहे.

राहुल गांधी नवनवे मुद्दे उपस्थित करत आहेत. बिहारमध्ये मतदार याद्या स्वच्छ होऊ शकतात; मग महाराष्ट्रात का नाही याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यायला हवे. त्यामुळे निदान या मुद्यावर निवडणूक आयोगाचा दृष्टिकोन लोकांना समजू शकेल. लोकशाहीत मतदार सर्वोपरी मानले जातात. त्या अर्थाने आयोगाने यासंदर्भात पारदर्शकता राखणे हा मतदारांचा हक्कच नव्हे का? यात सुवर्णमध्य काढण्याची आवश्यकता आहे. कारण विरोधी पक्षांनी नव्याने घेतलेल्या आयोगाच्या भेटीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत पुन्हा एकदा संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. गेली तीन-चार वर्षे राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासकाच्या ताब्यात आहेत. सुरुवातीला करोना, नंतर प्रभाग रचना किंवा त्यानंतर आरक्षणाचा मुद्दा अशी त्याची कारणे सांगितली जातात. कारणे कोणतीही असली तरी त्याचे तोटे मतदारांनाच सहन करावे लागतात. प्रशासन आणि जनता यामधील लोकप्रतिनिधी हे दुवा असतात. लोकांच्या गरजा, समस्या आणि मागण्या सरकारपर्यंत पोहोचवणे, त्यांची तड लावण्याचा प्रयत्न करणे, लोकांचे हक्क त्यांना मिळवून देण्याचे काम लोकप्रतिनिधी करतात. कामे करवून घेण्यासाठी ते प्रशासनावर दबाव आणू शकतात. प्रशासकीय राजवटीत त्याच दबावाचा अभाव आढळतो. कारण, त्यात जनतेचा सहभाग नसतो. मतचोरीच्या आरोपांमधील तथ्यांश लोकांसमोर येईलही कदाचित; पण त्यासाठी निवडणूक वारंवार पुढे ढकलणे व्यवहार्य ठरू शकेल का? नियमित निवडणुका घेणे म्हणजे घटनेच्या आदेशाचा आदर करणे होय आणि ते निवडणूक आयोगाचे काम आहे.

आयोगाचा कारभार पारदर्शक असणे मतदारांना अपेक्षित आहे. त्यामुळे मतचोरीचा आरोप आयोगाने गंभीरपणे घ्यावा आणि समाधानकारक खुलासा करायला हवा. भारतीय जनता पक्षाने आयोगाचे काम आयोगाला करू द्यावे. कारण मतचोरीच्या आरोपाने आयोगाच्या स्वायत्त प्रतिमेला धक्का पोहोचतो. स्वायत्त संस्थांची सार्वजनिक प्रतिमा पणाला लागणे, त्यांच्या कार्यपद्धतीविषयी संशय निर्माण होणे योग्य नाही. कारण त्यांच्याकडून निष्पक्ष काम अपेक्षित असते. निवडणूक पुन्हा एकदा पुढे ढकलली जाते की काय या शंकेने इच्छुकांच्या पोटात देखील गोळे आले असतील. कारण सामान्य पक्ष कार्यकर्ते फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्याचे स्वप्न पाहू शकतात. सत्तेचे राजकारण करण्याची संधी त्यांना याच निवडणुका मिळवून देतात. त्यामुळे प्रतिमा निर्माण करण्यासाठी, जनतेच्या नजरेसमोर राहण्यासाठी इच्छुक कार्यकर्ते मेहनत घेतात. खर्चही करतात. निवडणूक होणार..अशी वातावरण निर्मिती याआधीही एकदोनदा झाली होती. तेव्हा तेव्हा इच्छुक सक्रिय झाले होते. खर्चही मोठ्या प्रमाणावर केला गेला होता. यावेळी सर्वोच्च न्यायालयानेच मुदत घालून दिली. जानेवारी २०२६ पर्यंत निवडणूक घ्या असे आदेश राज्य सरकारला दिले. त्यामुळे निवडणुका होतीलच अशी खात्री इच्छुकांना होती. परिणामी, सार्वजनिक सण मोठ्या धुमधडायात पार पडले. पण आता पुन्हा एकदा खोडा घातला जाईल का या भीतीने ते अस्वस्थ झाले असावेत. त्यामुळे तेही आयोगाच्या भूमिकेच्या प्रतीक्षेत असणार.

## ह.भ.प. विलासराव गरड यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी

येथील रहिवासी ह.भ.प. विलासराव (संत) रावसाहेब गरड (वय-६२) रा.जालना रोड, बीड यांचे रविवारी संध्याकाळी ७ च्या सुमारास हृदय विकाराच्या धक्क्याने बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. हभप गरड यांचे वारकरी संप्रदाय मध्ये मोठे योगदान होते. त्यांचा अंत्यमविधी सकाळी १० वाजता लोणावळा ता.गेवराई जि. बीड त्यांच्या मूळ गावी होणार आहे. त्यांच्या पाश्चात पत्नी, तीन मुले, तीन सुना, नातवंड यांच्यासह भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे.



## कार्तिकी एकादशी साठी बीडच्या संत बंकटस्वामीच्या दिंडी चे पंढरपूर कडे प्रस्थान

### ८० वर्षाची वारीची परंपरा कार्तिकी एकादशीसाठी वारकरी मार्गस्थ

बीड । प्रतिनिधी

**कार्तिकीचा सोहळा! चला जावु पाहु डोळा।। या संतोक्ती प्रमाणे बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथील संत बंकटस्वामी महाराज यांच्या पालखी सह दिंडीचे पंढरपूर कडे प्रस्थान झाले, यावेळी महानता लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली ही पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.. बाल वर करा सह मोठ्या संख्येने वारकरी या दिंडीमध्ये सहभागी झाले होते.. पालखीला वाट लावण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



बीडच्या श्रीक्षेत्र नेकनुर येथून गेली ८० वर्षाची अखंडित वारीची परंपरा असलेल्या संत बंकट स्वामी महाराज यांच्या दिंडीचे प्रस्थान झाले. संत बंकट स्वामी महाराज यांनी या पालखी सोहळ्याची सुरुवात केली. मराठवाड्यातील मानाची दिंडी म्हणून पंढरपूर मध्ये आजही या पालखीची ओळख आहे. या पालखी सोहळ्यामध्ये संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर, संत श्रीराम महाराज मेहुणकर, संत एकनाथ महाराज पालशिंगणकर, यांच्यासह मराठवाड्यातील नामांकित संत महंत मंडळी सहभागी होऊन पंढरपूरकडे मार्गस्थ व्हायचे.. तेव्हापासून ही परंपरा अखंडित पद्धतीने सुरू आहे. सुरुवातीला घोड्याचा टांगा बैलगाडी वारकऱ्याचे साहित्य घेऊन जाण्यासाठी असत. सर्व वारकरी पायी चालत. आज काळाच्या ओघात घोड्याचा टांगा आणि बैलगाडी नाही.. प्रतिकूल काळात संत बंकट स्वामी महाराजांच्या नंतर संत सुदाम देव महाराज, संत एकनाथ महाराज पालखी नगर, संत रामहरी महाराज, संत दिगंबर महाराज यांनी परंपरा अविरतपणे चालवली.. आज महंत लक्ष्मण महाराज मेंगडे ही परंपरा जोपासत आहेत. शेकडो विद्यार्थ्यांना अध्यात्माच्या शिक्षणासह संस्काराचे धडे दिले आहेत.. त्यामुळे या पालखी सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने बाल वर्गासह इतर वारकरी सहभागी होतात. नेकनूर ते पंढरपूर ९ दिवसाचा पायी प्रवास करून वारकरी कार्तिकी एकादशी सोहळ्यासाठी पंढरी मध्ये दाखल होतो.ऊन वारा पाऊस याचा विचार न करता पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी या दिंडीत सहभागी होता..मराठवाड्यातिल प्रमुख दिंड्या मधील मानाची दिंडी अशी या दिंडीची ओळख आहे..या दिंडी बाल वारकऱ्याचे सोबतच शेकडो लोक या पालखीत सहभागी होतात.

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी-डॉ.सानप

बीड । प्रतिनिधी



काळजाला पिळ पडणारी घटना डॉ संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून ही एक प्रकारे व्यवस्थेने केलेली हत्याच आहे.शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याची वेळीच तक्रार देवुन व वरिष्ठांना सांगूनही वेळीच तक्रारीची दखल घेतली गेली नाही म्हणून डॉ संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली.भष्ट्र.उन्मत्त,मग्रूर पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने याने अनेक वेळा मानसिक त्रास दिल्याचे उघड झाले आहे.एका खासदारांनी पी ए च्या माध्यमातून. मेडिकल रिपोर्ट बदलण्यासाठी प्रचंड दबाव आणुन त्रास दिला.या सर्व घटना साखळी पद्धतीने करणाऱ्या टीम मध्ये प्रशांत बनकर व यांसारख्या अनेक नाराधमाचाही समावेश आहे.या सर्वांच्या जांचाला कंटाळून न्याय मिळत नसल्याने हाताशी होवुन डॉ संपदा मुंडे यांनी स्वतः ला संपवले.ही अतिशय गंभीर आणि चीड आणणारी संतापजनक बाब असून या घटनेची सखोल चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी.या घटनेची एस आय टी च्या माध्यमातून चौकशी व्हावी संबंधित गुन्हेगारांना,या प्रकरणातील खासदाराला, अधिकारी यांना सरकारने अभय देवु नये या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई व्हावी.स्व डॉ संपदा मुंडे कुटुंबाला न्याय मिळावा.अशी मागणी शासनाकडे. महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ राजेंद्र सानप यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

पान ६ वरून...

### डॉ. संपदा मुंडे आत्महत्येप्रकरणी

आणि मुंडे असल्याने तिच्या तक्रारींकडे वरिष्ठांनी दुर्लक्ष केले असेल, तर हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. तसेच त्यांनी या प्रकरणाची स्वतंत्र विशेष तपास पथक (डखढ) नेमून सखोल चौकशी करण्याची आणि हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून दोषींना कडक शासन करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त होत असून, महिला डॉक्टरांना न्याय मिळावा आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने तात्काळ आणि कठोर पावले उचलावीत संबंधित दोषींवर कठोर कारवाई करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

-----------

### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन

सारख्या ग्रामीण भागात मुलीसाठीच शाळा सुरू केली म्हणून आज एवढ्या प्रचंड संख्येने विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत आहेत शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत हे पाहून मनस्वी आनंद होत आहे. ते म्हणाले माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्यात विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली मनोगत ही अतिशय बोलके असतात वास्तविक पाहता हा शाळेच्या प्रगतीच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने चालता बोलता जीवन पटत असतो अशा प्रकारचे भावगर्भ विचार व्यक्त केले .सकाळच्या सत्रामध्ये सूत्रसंचलन अश्विनी वखरे व अंजली मुंडे यांनी केले. तर दुसऱ्या सत्रामध्ये स्वाती काळे, सरिता माळवदे यांनी सूत्रसंचालन केले दुपारच्या सत्रात संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात या विविध खेळ खेळण्यात सर्व विद्यार्थीनी रममान झाल्या. या सर्व कार्यक्रमाचे आभार अंजली केशवराव आंधळे या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक यांनी मानले .स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता संपन्न झाली.

-----------

### प्रत्येक कणात असलेल्या

- कन्यापूजन केवळ अष्टमीपुरते मर्यादित नसावे , मुलीला जन्म घेण्याचा अधिकार देणे , तिला शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे आणि समाजात तिचा आदर करणे हे खरे शक्तीचे प्रतीक आहे. ही पूजा आहे. महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता अभियान हे दिव्य गुरु श्री आशुतोष महाराज जी यांनी संतुलित समाज स्थापनेसाठी सुरू केले. संतुलन प्रकल्प अंतर्गत देशभरात केलेल्या प्रयत्नांबद्दल जाणून घेऊन, भक्तांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. दुर्गम वधाच्या संदर्भात, साध्वीजींनी समाजात वाढत असलेल्या पर्यावरण संरक्षणाच्या समस्येवर देखील चर्चा केली आणि लोकांना चांगल्या पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्यासाठी आणि निसर्गाचा शक्ती म्हणून आदर करण्यासाठी प्रोत्साहित करणे. सामाजिक जाणीव जागृत करण्यात आणि पर्यावरण संरक्षणात आई अहिल्याबाई होळकर यांचे विशेष योगदान देखील या पुस्तकात मान्य करण्यात आले आहे.कथेला चांगली उपस्थिती होती. ज्ञान आणि विज्ञानाने समृद्ध असलेली ही कहाणी या प्रदेशातील लोकांकडून विशेष कौतुकास्पद आहे. दिव्य दृष्टीच्या महान विज्ञानाच्या संदर्भात, साधकांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. सत्राच्या शेवटी, भाविक आणि परिसरातील लोकांनी विश्वमातेच्या मंगल आरतीत सहभाग घेतला. भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत! दिव्य ज्योती जागृति संस्था ही एक ना-नफा तत्त्वावर चालणारी आध्यात्मिक संस्था आहे जी दैवी गुरु श्री आशुतोष महाराज जी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन केली आहे आणि चालवली जाते. ही जगातील एकमेव आध्यात्मिक संस्था आहे जिथे देवाची चर्चाही केली जात नाही. त्याऐवजी, ते देवाचे थेट दर्शन देखील करवून देतात , दुसऱ्या दिवशीच्या कथेला ह.भ.प.जनाबाई राख,शिवकन्याताई सिरसाट, शिवाजी सिरसाट डॉ.प्रिया नागरगोजे,रंजना माळवे समाधानताई माने इत्यादी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

-----------

पान १ वरून...

### नाफेडच्या निकषांमुळे शेतकरी,

परंतु असे करण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यमान निकष लागू ठेवला गेला, तर कोणत्याच एफपीओला खरेदी केंद्र मिळणे शक्य नाही. अनेक कंपन्यांनी गेली चार-पाच वर्षे नियमितपणे खरेदी केंद्र चालवले आहेत. मात्र, एक टक्का कमिशनवर तीन वर्षांची सरासरी एक कोटी रुपयांचा टर्नओव्हर दाखविणे अशक्य आहे. काहींनी जाणीवपूर्वक टर्नओव्हर कमी दाखवल्याचा फटकासुद्धा आता यानिमित्ताने बसतो आहे, अशी खंतही व्यक्त होताना दिसत आहे. केंद्र निवडीच्या निकषांचा पुनर्विचार करून, पूर्वीपासून यशस्वीपणे खरेदी केंद्र चालवत असलेल्या संस्थांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी केल्या जात आहे. शेतकऱ्याने सध्या पहिल्या वेचणीचा कापूस विक्रीला सुरुवात केली आहे अशावेळी त्याच्या कापसाला योग्य भाव मिळणे आणि वेळेत पैसे येणे महत्त्वाचे आहे. मात्र या दोन संस्थांमध्ये अशा पद्धतीने भांडणे होत असतील तर या दोघांच्या भांडणांमध्ये शेतकरी चिरडला जाऊ शकतो अशी भीती अभ्यासकांनी व्यक्त केली आहे.

---------

### दहावी, बारावीच्या

राज्य शासनाने पूरग्रस्त जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर केला. त्या भागामध्ये दुष्काळाच्या सर्व सोयीसुविधा लागू झाल्या आहेत. त्यामध्ये दहावी व बारावीचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा देखील समावेश आहे. दुष्काळाची परिस्थिती असतानाच राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सलग चौथ्या वर्षी दहावी, बारावीच्या परीक्षा शुल्कामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. मार्च २०२६ मध्ये होणा-या परीक्षेसाठी सुधारित शुल्क घेतले जात आहे. दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क आता ४७० वरून ५२० केले.बारावीच्या विद्याथ्यर्थ्यांसाठीचे परीक्षा शुल्कही वाढविण्यात आले आहे. आता शुल्क ४९० वरून ५४० झाले आहे. शिक्षण मंडळाने केलेल्या शुल्क वाढीमुळे सर्वसामान्य पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. २०२६ मध्ये होणा-या परीक्षांसाठी सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे. दरम्यान, या शुल्क वाढीपासून पूरग्रस्त भागातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. पूरग्रस्त भागातील दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने लाखो विद्यार्थ्यांचे ते माफ होणार आहे.

------------

### दिवाळी स्नेहमिलनातं निवडणुकीची

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना भाजप नेत्या मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या कि हा कार्यक्रम दिवाळीच्या स्नेह मिलनाचा असला तरी तो अराजकीय नाही, कारण आता निवडणुका समोर आल्या आहेत. मी आज मुद्दाम हा दिवस निवडला आहे. आपण अनेक वर्ष संघर्षाला सामोरे जात आहोत. मुंडे साहेब गेले तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला आणि तुम्ही माझ्यासोबत सर्व ठिकाणी त्याबद्दल धन्यवाद, मी लोकसभा निवडणुकीत पडल्यावर माझ्यासाठी रडणारे आपण सर्वजण. मोठे मोठे लोक काही करू शकले नाही, त्याचा मला कधी राग आला नाही. वाईट एवढे वाटले की, लेकरांनी आत्महत्या केल्या. त्याचे मला आज देखील वाईट वाटते,'' असंही यावेळी पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. मी ठरवले आहे मी कधी हरणार नाही. मी या पक्षासाठी गोपीनाथ मुंडे यांचा पक्ष आहे म्हणून मी लढले.लोकसभेचा पराभव झाला पण मी कधी खचले नाही. मला मंत्रिपदाचा लोभ नाही. हे केवळ तुमच्यासाठी आहे. मी माझ्या घराचा एक मजला देखील वाढवला नाही.मी एकमेव आमदार आहे जी आज मंत्रिमंडळात मंत्री आहे. दरम्यान, यावेळी पंकजा मुंडेंनी पंकजा मुंडेंनी वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यावरही भाष्य केलं आहे, त्या म्हणाल्या की, ''काही जणांनी म्हटले की, पंकजा ताईने कारखाना म्हणजे मुंडे साहेबांचा कारखाना त्यांचा आत्मा गहाण ठेवला आहे, त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. काही लोकांच्या कारखान्याच्या लॉकला गंज चढला आहे. त्यांना कोणी काही बोलत नाही. त्यामुळे आता आपला कारखाना हा सुरू झाला आहे. यंदा वैद्यनाथ साखर कारखाना १० हजार गाळप देणार आहे.यावेळी व्यासपीठावर माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार केशवराव आंधळे, माधवराव निर्मळ, गेवराईचे बाळराजे पवार आदींसह भाजपचे जिल्ह्यातील पदाधिकारी, सर्व आघाड्यांचे प्रमुख आदी उपस्थित होते.

**माजी मंत्री बदामराव पंडित, माधव निर्मळ भाजपात**

दरम्यान, आजच्या दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमात पंकजाताई मुंडे यांनी बेरजेचे राजकारण करत आगामी निवडणुकांच्या दृष्टीने जिल्ह्यातील दिग्गजांची मोट बांधल्याचे दिसून आले. यावेळी गेवराईचे माजी मंत्री बदामराव पंडित, माजलगांवचे नेते माधवराव निर्मळ यांचा भाजपात जाहीर प्रवेश झाला तर भाजपमध्येच असणारे पण मधल्या काळात दुरावलेल्या गेवराईचे बाळराजे पवार व माजी आमदार केशवराव आंधळे यांनी ताईंच्या नेतृत्वावर निष्ठा व्यक्त करत जोमाने कामाला लागण्याचा संकल्प व्यक्त केला.

---------

### महामार्गासाठी पैसे, पण

यांच्यावर टोलाही लगावला. ''काही लोक फक्त बोलत राहतात, पण आम्ही साईबाबांचा 'श्रद्धा आणि सबुरी'चा मंत्र जोपासला आहे. वेळ येईल, फक्त सबुरी ठेवा,'' असंही त्यांनी सांगितलं. ''सरकारचे मंत्री फक्त पाहणीसाठी फिरतात. जलजीवन मिशनची कामं अपूर्ण आहेत, अनेक ठिकाणी पाइपलाइन फुटल्या आहेत. आम्ही केंद्राकडे तक्रार करून चौकशी लावली आहे. सत्ता मिरवण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या आयुष्यात बदल करण्यासाठी असते,'' असा टोला त्यांनी लगावला. सुळे यांनी सरकारला थेट इशारा दिला. ''मी या सरकारमध्ये नसणे, हेच माझं भाग्य आहे. जोपर्यंत सरसकट कर्जमाफी होत नाही, तोपर्यंत आम्ही सरकारला स्वास्थ बसू देणार नाही.'' असे त्या म्हणाल्या. भाषणादरम्यान सुळे यांनी दिवंगत आर.आर. पाटील यांच्या आठवणी जागवल्या आणि महिलांना सत्तेत स्थान देऊन खरा सन्मान कसा केला हे सांगितलं. तसेच, संग्राम जगताप यांच्या भडकाऊ वक्तव्याचा उल्लेख करत त्यांनी इशारा दिला. ''माझ्या मतदारसंघात येऊन कोणी अशी विषारी भाषा वापरली, तर येऊ देणार नाही. टाटा, लस, औषधं सगळं चालतं, मग समाजावर टीका का? असं भाषण सहन होणार नाही. ''जो तुमच्या सुख-दुःखात असतो, त्यालाच मत द्या असे आवाहन सुळे यांनी केले.

--------------

### महिला डॉक्टर आत्महत्या

अगोदर एक डॉक्टर स्वत: ला पीजी करायचं आहे ती डॉक्टर आत्महत्या करु शकत नाही. जसा घरच्यांचा समज आहे, ही हत्या घडवून आणली आहे, याची चौकशी झाली पाहिजे. मुख्यमंत्र्यांना एसआयटी स्थापन करण्यासाठी मागणी केली आहे. त्या एसआयटीमध्ये वरिष्ठ आयपीएस महिला अधिकारी असाव्यात. त्या जिल्ह्यातील तपास अधिकारी न ठेवता वरिष्ठ महिला तपास अधिकाऱ्यांकडून तपास व्हावा, असं धनंजय मुंडे म्हणाले. ज्या चार पाच पुढाऱ्यांनी काही महिन्यांपूर्वी बीड जिल्ह्याला बदनाम केले. त्यावेळी बीड जिल्ह्यातील प्रत्येक जात, अठरा पगड जाती बदनाम होत होत्या. याच्यातील कोणी कोणी बाहेर शिकायला होतं, नोकरी करत होतं, त्याचा विचार बीड जिल्हा बदनाम करताना कोणी केला नाही. त्याला हे देखील कारणीभूत आहेत, नाहीतर हिणवण्या झाल्या नसत्या. न समोर येणाऱ्या गुपचूपपणानं गाव सोडून कोसो किलोमीटरवर लोकं किती हिणवण्या सहन करत असतील त्याचा आज विचार केला पाहिजे, असं धनंजय मुंडे म्हणाले.

**मारहाण झालेला मुकादम समोर आणला**

एका ऊसतोड मुकादमाला समोर आणून मुंडेंनी सातारा जिल्ह्यात असलेल्या कारखान्याकडून होणारी पिळवणूक समोर आणली. मुकादमाचे नऊ दहा ट्रॅक्टर खासदाराच्या साखर कारखान्यावर राहिले असताना मुकादमाला बेदम मारहाण करण्यात आली. मरेपर्यंत मारल्यानं ॲडमिट करुन घ्यावं लागणार ही स्थिती डॉक्टर तरुणीवर आली. त्यावेळी ज्या खासदाराचा साखर कारखाना त्यांच्या पीएने डॉक्टरवर दबाव टाकला. मुकादमाचा बीपी नॉर्मल आहे, हे सांगून त्यांना परत पाठवावा यासाठी पीएनं दबाव टाकला. आता मी शासनाला स्वस्त बसू देणार नाही मी मृत डॉक्टरला न्याय मिळवून देणारच, असं धनंजय मुंडे म्हणाले.

------------------

### शेतकऱ्यांना २०२६ नंतर मोफत

कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत मिळावी, या उद्देशाने राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. सरकारची ही एक महत्त्वकांक्षी योजना आहे. मात्र सध्या ही योजना चांगलीच चर्चेमध्ये आहे. त्यामागे अनेक कारणे आहेत.ही योजना सुरू करताना सरकारने काही अटी आणि नियम घातले होते. मात्र पात्र नसताना देखील अनेक महिलांनी आता या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ज्या महिला या योजनेसाठी पात्र नाहीत अशा महिलांची नावे या योजनेतून वगळण्यात येत आहेत. काही ठिकाणी तर सरकारी नोकरीमध्ये असताना देखील महिलांनी या योजनेचा लाभ घेतल्याचा प्रकार समोर आला आहे, त्यामुळे सरकारकडून आता अशा प्रकरणाची गंभीर दखल घेतली गेली असून या महिलांची नावे वगळण्यात येत आहेत.मात्र दुसरीकडे विरोधकांकडून लवकरच ही योजना बंद होणार असल्याचा आरोप करण्यात येत आहे, लाडकी बहीण योजनेतून काही महिलांची नाव वगळी जात आहेत, त्यावर देखील विरोधकांकडून प्रश्न चिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. ही योजना फक्त निवडणुकीपूरतीच होती अशी टीका विरोधकांकडून सुरू आहे, यावर आता पुन्हा एकदा फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना मोठे वक्तव्य केले आहे.

----------

### अलर्ट;राज्यात पुढील

वा-याचा दिला आहे. कमी दाब प्रणालीमुळे राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. फक्त पुणेच नाही तर राज्यातील अनेक भागांमध्ये आज वादळी वा-यासह जोरदार पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात काही भागात आज पावसाचा तडाखा बसण्याचा अंदाज आहे. मुंबई, ठाणे, पालघर, कोकण, रायगड, मध्य मध्य महाराष्ट्र, सोलापूर, पुणे, आहिल्यानगर, नाशिक, जळगाव, नंदुरबार, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, जालना, बीड, लातूर, धाराशिव, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, नांदेड या भागात वादळी वा-यासह पावसाचा अंदाज आहे.अरबी समुद्रासह बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील आठवड्यातील बुधवारपर्यंत कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाला पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरातील क्षेत्राचे चक्रीवादळात रूपांतरण होणार असून अरबी समुद्रातील क्षेत्रामुळे मुंबईसह लगतच्या परिसरांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

----------

### ही आत्महत्या नव्हे तर

करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनीच हा सर्वात घृणास्पद गुन्हा केला, असे ते म्हणाले.भाजपशी संबंधित काही प्रभावशाली लोकांनी तिच्यावर भ्रष्टाचार करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्नही केला. संरक्षित गुन्हेगारी विचारसरणीचे हे सर्वात घृणास्पद उदाहरण आहे. ही आत्महत्या नसून संस्थात्मक हत्या आहे. जेव्हा सत्ता गुन्हेगारांना संरक्षण देते, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोण करू शकते? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला.डॉक्टरच्या मृत्यूने भाजप सरकारचा अमानवी आणि निर्दयी स्वभाव उघडकीस आणला आहे. न्यायाच्या या लढाईत आम्ही पीडितेच्या कुटुंबासोबत खंबीरपणे उभे आहोत. भारताच्या प्रत्येक मुलीसाठी आता भीती नाही, आम्हाला न्याय हवा आहे, अशी मागणीही राहुल गांधी यांनी केली.

------------

### पंढरपूर टू बीड सोलापूर

झाला होता. यानंतर त्याला शहर पोलीस ठाण्यात नेण्यात आलं. रात्री एकच्या सुमारास त्याला वैद्यकीय तपासणीसाठी नेलं होतं. त्यानंतर पहाटे चार वाजता त्याला पुन्हा पोलीस ठाण्यात आणण्यात आलं. सरेंडर झाल्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत पीएसआय बदणे याने तोंड उघडलं. तो तपास अधिकाऱ्यांसमोर ढसाढसा रडल्याची माहिती आहे. त्याने आपण महिला डॉक्टरवर कसल्याही प्रकारे अत्याचार केला नाही, असं पोलिसांना सांगितलं प्रकरणाचा तपास सुरू आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २७ ऑक्टोबर २०२५




## एमआयडीसीतील विकास कामांचा डिपीआर तयार करावा -पंकजा मुंडे

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील एमआयडीसी परिसराचा (औद्योगिक वसाहत) सर्वांगिण विकासाकरीता डिपीआर तयार करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी एमआयडीसी अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत पालकमंत्री श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, एमआयडीसीचे क्षेत्र व्यवस्थापक, सौ.सुषमा नगरदेवळेकर, सहाय्यक अभियंता मस्तान शहा, प्रमुख भूमापक रमेश डोईफोडे आणि उद्योजकांची उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना येथील औद्यागिक वसाहतीमध्ये अनेक मोठ्या औद्योगिक संस्था कार्यरत आहेत. परंतू याठिकाणी आवश्यक रस्ते, पार्किंग, सुरळीत वीज पुरवठा आदी सुविधा नाहीत. याकरीता औद्योगिक वसाहतीत विविध विकास कामे व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एमआयडीसीने लवकरात लवकर डीपीआर तयार करावा. एमआयडीसीच्या ४ थ्या फेजकरीता जागा पाहून प्रस्ताव सादर करावा. लवकरच याबाबत उद्योग विभागात बैठक लावून उद्योजकांचे प्रश्न मार्गी लावण्यात येतील असे सांगितले.यावेळी उद्योजकांच्या संघटनेने औद्यागिक वसाहतीतील रस्ते, स्ट्रीट लाईट, ट्रक पार्कींग, ड्रेनेज व्यवस्था, जुना बायपास रस्ता, सीटी बस सुरु करणे, मल्टीपार्क बाबत, बायपासच्या टप्पा-३ जवळ उड्डानपुल आदी मागण्या सादर केल्या.

## डॉ.संपदा मुंडे प्रकरणी पोलिस यंत्रणाच दोषी-आ.धस

### महिला आयपीएस अधिकाऱ्याची नेमणूक करून एस आयटी स्थापन करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

डॉक्टर संपदा मुंडे प्रकरणी वारंवार तक्रार करून याची दखल घेतली गेली नाही. याचाच अर्थ संपूर्ण पोलिस यंत्रणाच दोशी असून या प्रकरणात महिला आयपीएस अधिकाऱ्याची नेमणूक करून एसआयटी स्थापन करूनच या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली.




त्यांनी रविवारी वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे डॉक्टर संपला मुंडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. यानंतर ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की एखाद्या मजुराचा बीपी दोनशेपर्यंत असल्यानंतरही त्याला फिटनेस सर्टिफिकेट कसे काय दिले जाते. त्यासाठी कोण दबाव आणत होतं. डॉक्टर संपदा मुंडे यांच्यावर वारंवार कोणाचा दबाव होता. अनेक वेळा तक्रार करूनही पोलिसांनी याची दखल का घेतली नव्हती? याबरोबरच आरोग्य विभागातील वरिष्ठही संपदा मुंडेच्या तक्रारीची दाखल का घेत नव्हते. हा साराच प्रकार संशयास्पद असून या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन डॉक्टर संपदा मुंडे यांना न्याय मिळावा यासाठी मी उद्या मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याचेही यावेळी आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

ज्यावेळी डॉक्टर संपदा मुंडे यांनी आत्महत्या केली. त्यानंतर कुटुंब फलटणला पोहोचेपर्यंत त्यांनी तिला खाली कसे काय घेतले? आणि पोस्टमार्टम रिपोर्ट साठी कसे काय नेले? ही बाब ही संशयास्पद आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी आमची मागणी आहे. आणि पोलिसांनी कुटुंबीयांवरही दबाव न आणता त्यांचे जबाब बीडला येऊन नोंदवावेत अशी मागणी त्यांनी यावेळी केली. या प्रकरणातील पोलीस अधिकारी आणि इतर जे कोणी दोशी असतील यांचा उल्लेख तिच्या पत्रात आहे. त्या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. तरच या प्रकरणाचा उलगडा होईल आणि यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांनाही सविस्तर माहिती देणार आहोत. असे यावेळी सुरेश धस यांनी सांगितले.

## बीड पोलिसांची भूमिका संशयास्पद, आरोपी शिराळे अद्याप फरारच

### यश ढाका हत्या प्रकरण : ३१ ऑक्टोबरला एसपी ऑफिससमोर धरणे तर ३ तारखेला मोर्चा

बीड । प्रतिनिधी

यश ढाका या तरूणाची हत्या होऊन महिना उलटला तरीही पुरवणी जबाबातील शिराळे नामक आरोपीला पोलीसांनी अद्याप अटक केलेली नाही. एवढ्या गंभीर प्रकरणात त्याचे नाव असतांना पोलीसांनी साधा त्याचा शोध घेण्याचा, लोकेशन ट्रेस करण्याचाही प्रयत्न केलेला नाही. यावरून पोलीसांची भुमिका संशयास्पद असल्याचे दिसुन येत आहे. पोलीस प्रशासन या प्रकरणाच्या तपासाला कसलीही गती

देण्याचा प्रयत्न करत नसल्याच्या निषेधार्थ दि.३१ ऑक्टोबर रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन तर दि. ३ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे यश ढाका यांचे वडिल देवेंद्रसिंह ढाका यांनी सांगितले. बीड शहरातील अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी यश ढाका या तरूणाची निघृण हत्या होऊन २५ ऑक्टोबर रोजी १ महिना झाला. मात्र पोलीस प्रशासनाने या प्रकरणात म्हणावा तसा तपास केलेला नाही. हत्या झाली त्याच दिवशी पोलीसांनी सुरज काटे या एका आरोपीला अटक केली होती. त्यानंतर यशचे वडिल देवेंद्रसिंह ढाका यांनी दिलेल्या पुरवणी जबाबात सुरज काटे, सोमनाथ काटे, कृष्णा सोनवणे, निखील घोडके, गणेश शिराळे या पाच जणांची नावे दिली होती. त्यापैकी सुरज काटे हत्या झाली त्याच रात्री पोलीसांपुढे सरेंडर झाला होता. त्यानंतर पोलीसानी सोमनाथ काटे, कृष्णा सोनवणे, निखील घोडके यांना अटक केली, मात्र या प्रकरणातील शिराळे नामक आरोपीला अद्याप अटक केलेली नाही. या प्रकरणात चार आरोपी पकडले. त्यांना सुरूवातीला पोलीस कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडी झाली आता प्रकरण मिटले असे पोलीसांनी गृहीत धरले की काय ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. मात्र या प्रकरणात पुरवणी जबाबातील आरोपी शिराळे याचा पोलीस साधा शोध सुध्दा घेत नाहीत. तो अजूनही फरार आहे. मात्र त्याचे साधे लोकेशन देखील ट्रेस केले जात नाही. यावरून पोलीसांची भुमिका संशयास्पद असल्याचे दिसुन येत आहे. त्याच अनुषंगाने यश ढाका या तरूणाला न्याय देण्यासाठी दि. ३१ ऑक्टोबर रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन तर दि. ३ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचे देवेंद्रसिंह ढाका यांनी सांगितले.

### न्याय न मिळाल्यास मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यासमोर उपोषण करणार - देवेंद्र ढाका

या प्रकरणात सुरुवातीपासून गणेश शिराळे ला वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. चौथा आरोपी निखिल घोडके यांच्या मोबाईल वरून गणेश शिराळे याचे यश ढाका याच्या सोबत संभाषण झाले. मात्र सुरुवातीपासूनच गणेश शिराळेला पोलिसांकडून सॉफ्ट कॉर्नर देण्यात आले. घटनेच्या दुसऱ्या दिवशी गणेश शिराळे फरार झाला परंतु साधी चौकशीही त्याची करण्यात आली नाही. वारंवार पोलिसांना ताब्यात घेत चौकशी करण्याचे मागणी करण्यात आली मात्र पोलीस कोणत्या दबावात काम करत आहे, सी डी आर मध्ये सर्व संभाषण आले असतानाही गुन्हा दाखल करण्यास पोलिसांची टाळाटाळ. यामध्ये नक्कीच काहीतरी शिजले असावे, न्याय न मिळाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या बंगल्यासमोर सहकुटुंब आमरण उपोषण करणार असल्याचे देवेंद्र ढाका यांनी म्हटले आहे.

## मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात स्नेहमेळावा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयातील २००५-०६ च्या १० वी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दि.२६ आक्टोबर रविवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींने शाळेच्या संपूर्ण परिसरात वृक्षारोपण केले.

२० वर्षानंतर झालेल्या या स्नेह मेळाव्यात अनेक जुन्या आठवणींना विद्यार्थ्यांनी उजाळा दिला.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले विद्यालयाने दिलेले संस्कार आम्ही जीवनभर विसरू शकत नाही. गुरुंनी दिलेली शिस्त, चिकाटी,सचोटी यामुळेच आम्ही जीवनात घडलो अशी कृतज्ञता व्यक्त करत स्नेह मेळावा पार पडला.



या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम घडवून आणल्यामुळे एकमेकांच्या भावना एकमेकांपर्यंत पोहोचल्या असून यातून विचारांची आदान प्रदान झाली,या स्नेह मेळाव्याद्वारे सर्व विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती होवो अशा उपस्थित मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके, प्रविण घोडके व गुरुजनांनी शुभेच्छा दिल्या.

या स्नेह मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी, विद्यार्थिनीने परिश्रम घेतले.

## डॉ. संपदा मुंडे या तरुणीच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करावी - ॲड. राऊत

बीड । प्रतिनिधी

साताऱ्यातील फलटण शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टर संपदा मुंडे यांनी शहरातील एका हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. मृत डॉक्टरने आत्महत्येपूर्वी तिच्या तळहातावर सुसाइड नोट लिहिली असून, त्यात तिने दोन पोलिस अधिकाऱ्यांवर मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. डॉक्टर महिलेने सुसाइड नोटमध्ये म्हटलं आहे की, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांनी तिच्यावर वारंवार अत्याचार केला होता. तसेच पोलीस अधिकारी प्रशांत बनकर यांनी तिचा सलग चार महिने मानसिक छळ केला होता. महिलेच्या हातावरील सुसाइड नोटची आता फॉरेन्सिक तपासणी केली जाणार आहे. दुसऱ्या बाजूला या घटनेने नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

फलटणमधील या घटनेने महाराष्ट्र हादरला असून नागरिकांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेले पोलीसच मानसीक छळ करत असतील तर जनतेने कोणाकडे पाहायचं? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. डॉक्टर महिलेने सुसाइड नोटमध्ये स्पष्ट लिहिलं आहे की, माझ्या मरण्याचे कारण पोलीस निरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर ज्याने मागील पाच महिन्यांपासून माझा शारीरिक व मानसिक छळ केला. कायद्याचे रक्षक असलेले पोलीसच जर भक्षक बनत असतील तर यापेक्षा काय वाईट आहे? या डॉक्टर महिलेने पीएसआय बदनेने चार वेळा अत्याचार केला. पोलिस प्रशांत बनकर याने मानसिक त्रास दिला असं सुसाइड नोटमध्ये लिहिलं आहे. या महिलेला काय त्रास सहन करावा लागला असेल याची कल्पना करवत नाही. सुशिक्षित महिलेला असे पाऊल उचलावे लागत असेल तर सामान्य महिलांची काय परिस्थिती असेल? ज्यांच्याकडून सुरक्षेची हमी मिळाली पाहिजे तेच मारेकरी झाले तर काय करायचे? या नराधमांना फाशीची शिक्षा सुनावली पाहिजे. फास्ट ट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालले पाहिजे. अशी मागणी देखील ड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

## अशोक पटवर्धन यांच्या उपस्थितीत अनिल जगताप यांनी नगर पालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले!

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, मराठवाडा संपर्क मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब व मराठवाडा संपर्क नेते अर्जुन खोतकर साहेब यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली शिवसेना विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब आणि जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची काल दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरातील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड येथे महत्त्वपूर्ण रणनीती बैठक पार पडली असून या बैठकीत शिवसेना विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब आणि



जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी प्रभाग निहाय उमेदवार कसे असावेत?, प्रचार कसा करावा?, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक स्तरावरील रणनीतीवर सखोल मार्गदर्शन करून शिवसैनिकांशी मुक्त संवाद साधला. या बैठकीस मोठ्या संख्येने इच्छुक नगरसेवक व नगराध्यक्ष उपस्थित होते. त्यांनी शिवसेना पक्षाचे इच्छुक उमेदवार म्हणून रीतसर अर्ज भरून दिले. तसेच भावी नगराध्यक्ष पदासाठी बीडमधून तीन सक्षम उमेदवारांची प्राथमिक स्वरूपाची मुलाखत देखील घेण्यात आली. तसेच आम्हाला योग्य युतीमध्ये सन्मान मिळाला तर आम्ही महायुतीसोबत राहू अन्यथा नगर पालिका निवडणुक आम्ही स्वबळावर लढवू. प्रत्येक प्रभागात आमच्याकडे इच्छुक असणारे सक्षम उमेदवार आहेत तर नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेकडे प्रियंका आकाश वाडमारे, मंदाबाई मारुती जाधव आणि शितल प्रतिक कांबळे या इच्छुक उमेदवारांची नावे समोर आली आहेत. असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या बैठकीस जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले, युवसेना जिल्हाप्रमुख रविराज बडे यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक उपस्थित होते.

### नगराध्यक्ष पदासाठी शिवसेनेकडून तीन प्रमुख उमेदवार!

बीड नगरपरिषद व नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या मुख्य रणनीती बैठकीत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी शिवसेना नगराध्यक्ष पदासाठी प्रियंका आकाश वाघमारे मंदाबाई मारुती जाधव आणि शितल प्रतिक कांबळे असे तीन उमेदवार इच्छुक असल्याची माहिती दिली. तसेच यावेळी सर्व सामान्य घरातला नगराध्यक्ष निवडून आणणार असल्याचा ठाम विश्वास अनिलदादा जगताप यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला.

### बीड नगर पालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवणार- अशोक पटवर्धन

शिवसेना नगर पालिका निवडूकिसाठी पूर्णतः सज्ज असून यंदा सर्व सामान्य घरातील नगराध्यक्ष निवडून आणुन बीड नगर पालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवणार असा ठाम विश्वास शिवसेना विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब आणि जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी व्यक्त केला.

## तेलगाव जिल्हा परिषद निवडणुकीसाठी डीपीआयची आढावा बैठक

### तेलगावमधून मनीषा कांबळे यांचे नाव अजिंक्य चांदणें यांच्याकडून घोषित

दिंद्रुड । प्रतिनिधी

जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजले असुन, येत्या काही काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने उमेदवाराची चाचपणी चालू आहे. बीड जिल्ह्यातील तेलगाव जिल्हा परिषद गटासाठी मनीषा नवनाथ कांबळे यांच्या उमेदवारी ची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी काल शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित आढावा बैठकीत केली.




महाविकास आघाडीसोबत डिपीआय हा पक्ष असून जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील राखीव गटासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे आपण मागणी करणार असल्याचे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी तेलगाव येथील आढावा बैठकीत सांगितले. यात तेलगाव गटाच्या जागी आपण कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असून या भागात डीपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांच्या सुविद्य पत्नी मनीषा कांबळे यांच्या उमेदवारीची घोषणा अजिंक्य चांदणे यांनी शुक्रवारी सायंकाळी येथील आढावा बैठकीत केली. यावेळी बोलताना महाविकास आघाडीने आमचा विचार केला नाही तर आम्ही कुणाच्याही ताटाखालचे मांजर होणार नाही तर स्वबळावर या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे ही सांगितले. यासाठी समाजासह तेलगाव गटातील मतदारांच्या दारादारात जाऊन मतांची चाचपणी करण्याच्या सूचना चांदणे यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. या बैठकीस तेलगाव जिल्हा परिषद गटातील डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चा बहुसंख्य कार्यकर्ता वर्ग उपस्थित होता.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाने युती धर्म पाळत कसलीही अपेक्षा न ठेवता महाविकास आघाडीचे काम केले. याचीच जाण राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार व खासदार बजरंग सोनवणे ठेवतील व आम्हास या निवडणुकीत न्याय देतील अशी अपेक्षा आहे.

- अजिंक्य चांदणे

प्रदेशाध्यक्ष डी पी आय महाराष्ट्र राज्य

### कोण आहेत नवनाथ कांबळे

नवनाथ कांबळे हे तेलगाव गटातील मोहखेड येथील रहिवासी असून ते रिपोर्टरचे पत्रकार आणि डीपीआय चे बीड युवक जिल्हाध्यक्ष आहेत. सामाजिक कार्यात कांबळे सदैव अग्रेसर असतात. तेलगाव गटातील प्रत्येक गावात त्यांनी आपल्या सामाजिक दायित्वाने विशेष ओळख निर्माण केली असून, या निवडणुकीत त्यांच्या सुविद्य पत्नी मनीषा नवनाथ कांबळे या महाविकास आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवणार असल्याचे संकेत आहेत.

## डॉ.संपदा मुंडेंची आत्महत्या नाही तर हत्याच; गुन्हेगारांना मरेपर्यंत फाशी द्या!

### विविध सामाजिक, शासकीय संघटना, सोमवारी कॅन्डल मार्च तथा आक्रोश मोर्चा!

बीड (प्रतिनिधी ) : पोलीस व आरोग्य विभागातील अधिकारी व राजकीय दबावामुळे बीड जिल्ह्याची भूमिकन्या डॉ. संपदा मुंडे हिने आत्महत्या केली आहे. ही आत्महत्या नसून हत्याच आहे. डॉक्टर संपदाच्याखूनास जबाबदार पोलीस, आरोग्य विभागातील अधिकारी व दबाव आणणारे खासदार व राजकीय पदाधिकाऱ्यांना मरेपर्यंत फाशी देण्यात यावी यासाठी बीड शहरातील विविध सामाजिक संघटना कॅन्डल मार्च तथा आक्रोश मोर्चा काढणार आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्याची भूमिकन्या, शेतकरी कन्या डॉक्टर संपदा मुंडे ही फलटण येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. पोलीस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या जाचाला कंटाळून तीने आत्महत्या केली. त्यामुळे राज्यात संतापाची लाट ऊसळली असून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवून गुन्हेगारांना फाशी द्यावी या मुख्य मागणीसह आदी मागण्यासाठी बीड शहरातील विविध सामाजिक संघटना छत्रपती शिवाजीमहाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सायं ६.०० वा कॅन्डल मार्च तथा आक्रोश मोर्चा काढणार आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्था पार रसातळाला गेली असून यास गृहमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत. त्यांच्याकडे मुख्यमंत्री पदासह अनेक मंत्रीपदाचा कार्यभार असल्यामुळे ते गृहमंत्रालयास न्याय देवू शकत नसल्याने राज्यात खून, मारामाऱ्या, महिलांवरील अत्याचार वाढले असल्याने देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणीही करण्यात आली आहे. सदरील कॅन्डल मार्च तथा आक्रोश मोर्चामध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन शासकीय कर्मचारी संघटना, संभाजी ब्रिगेड, स्वाभिमानी शेतकरी संघटना, भा.क.प.,मा.क.प., शे.का.प., आम आदमी पार्टी, काँग्रेस,ईंटक संघटना ,राष्ट्रवादी शरद पवार गट, भगवा धारी प्रतिष्ठान, मातृभूमी प्रतिष्ठान, एकल महिला संघटना, लेक लाडकी अभियान, बीड शहर बचाव मंच, शिव क्रांती युवक प्रतिष्ठान, माहिती अधिकारी महासंघ आई तुळजाभवानी सामाजिक प्रतिष्ठान शिवशक्ती भीमशक्ती संघटना मराठवाडा शिक्षक संघ,महिला फेडरेशन, अंनिस, हमाल मापाडी संघटना, अन्याय- अत्याचार -भ्रष्टाचार निर्मूलन समिती ,मेडिकल ऑफिसर संघटना, मॅग्मा संघटना, नॅचरोपॅथी असोसिएशन, आयुर्वेदिक असोसिएशन आदी संघटना, नागरीक, सहभागी होणार असून सर्वांनी मोर्चा व कँडल मार्च मध्ये जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन विविध संघटने च्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# शेतकरी कर्ज माफीसाठी मुहूर्त कधी निघणार?

## आजवर एवढा लबाड मुख्यमंत्री पाहिला नाही; बच्चू कडू यांनी सरकारला फटकारले

अमरावती: शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी अभ्यास सुरू आहे असे म्हणणा-या मुख्यमंत्र्यांना आपण सर्वजण चार-चार पुस्तके पाठवून देऊ. अजूनही कर्जमाफीचा मुहूर्त काढायला बामणाची वाट पाहत आहात का? तुम्हाला मिळत नसेल तर यूपीमधून एखादा बामन आणून देतो, पण शेतक-यांची लगेच कर्जमाफी करा. अशा शब्दात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. काल रात्री सांगोला तालुक्यातील घेरडी येथे शेतक-यांचा आसूड मेळावा घेण्यात आला होता. त्यावेळी कडू बोलत होते. या मेळाव्यासाठी महादेव जानकर, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख आणि आबासाहेब मोटे आदी उपस्थित होते.

आजवर इतका लबाड मुख्यमंत्री देशाने पाहिला नाही, एवढे लबाड देवाभाऊ बोलतात असे सांगत आता सोयाबीन खरेदीचा प्रस्ताव केंद्राला पाठवल्याचे ते सांगतात. नंतर मोदींना कधी जाग यायची आणि कधी सोयाबीन खरेदी व्हायची, अशा शब्दात बच्चू कडू यांनी आसूड ओढले. दुर्दैवाने सध्या ज्यापासून झेंडा बनतो त्या कापसाला किंमत नाही, पण झेंड्याच्या रंगाला मात्र किंमत आली आहे. अशी टीका करताना तुम्ही कोणताही झेंडा घ्या, मात्र या झेंड्यासाठी कापूस बनविणारा तुमचा बाप शेतक-याच्या कापसाला किंमत नाही, अशी टीका कडू यांनी केली. एक लाख कोटी बजेट असणा-या मुंबईला राज्य सरकारच्या बजेटमधून ६५ हजार कोटी रुपये देतात. मात्र उर्वरित राज्याला त्यापेक्षा कमी मिळते. हे अर्थकारण का? असा सवाल करीत आम्ही शेतकरी संख्येने जास्त, आवाजाने जास्त, मतदानानेही जास्त आणि पिकविण्यातही जास्त असून आमच्यापेक्षा मूठभर कंपनीवाल्याला जादा बजेट दिले जाते.

### शेतकऱ्यांना एकत्र येणाचे आवाहन

एकमेव कारण शेतकरी जागा होत नाही हेच असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. यावेळी मोदींवर टीका करताना ५६ इंच वाले मोदी ट्रम्पला घाबरतात आणि तिथे त्याच्यापुढे नमाज पडतात, असे सांगत शेतक-यांवर केंद्र आणि राज्य दोन्ही सरकारकडून अन्याय होत आहे. आता शेतक-यांनी जात, धर्म, पक्ष, सोडून एकत्र आल्याशिवाय आपल्याला न्याय मिळणार नसल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले.




### महत्वाच्या घटना

१४२० : बीजिंगला अधिकृतपणे मिंग साम्राज्याची राजधानी म्हणून नियुक्त केले गेले.
१४९० : क्रिस्टोफर कोलंबस पहिल्या प्रवासानंतर क्युबा मध्ये पोहोचले.
१६३६ : अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठाची स्थापना
१८८६ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ग्रोव्हर क्लीव्हलँड यांनी स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा राष्ट्राला अर्पण केला.
१९०४ : पनामा आणि उरुग्वे यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९२२ : बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्त्वाखाली ईटलीतील फॅसिस्टांनी रोममधील सरकार उलथवले.
१९४० : दुसरे महायुद्ध ईटलीने ग्रीसवर हल्ला केला.
१९६९ : तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र सुरू झाले

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६७ : मार्गारेट नोबल ऊर्फ 'भगिनी निवेदिता' स्वामी विवेकानंदांच्या शिष्या, भारतीय संस्कृतीच्या आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्या मूळच्या आयरिश होत्या. २५ मार्च १८९८ रोजी स्वामी विवेकानंदांनी त्यांना विधिवत ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा दिली व त्यांचे नाव 'निवेदिता' ठेवले. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १९११)
१८९३ : शंकर केशव कानेटकर ऊर्फ 'कवी गिरीश' (मृत्यू: ४ डिसेंबर १९७३)
१९३० : लालजी पाण्डेय तथा 'अंजान' हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९७)
१९५५ : इन्द्रा नूयी भारतीय वंशाच्या अमेरिकन कॉर्पोरेट अधिकारी
१९५५ : बिल गेटस मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक
१९५६ : मोहम्मद अहमदिनेजाद ईराणचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५८ : अशोक चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, उद्योगमंत्री आणि खाणकाममंत्री
१९६७ : ज्यूलिया रॉबर्टस अमेरिकन अभिनेत्री
१९७९ : युट्यूब चे सहसंस्थापक जावेद करीम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२७ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (जन्म: ३० ऑगस्ट १५६९)
१८११ : हिज हायनेस राजराजेश्वर सवाई श्रीमंत यशवंतराव होळकर बहादूर (जन्म: ३ डिसेंबर १७७६)
१९०० : मॅक्समुल्लर जर्मन विचारवंत (जन्म: ६ डिसेंबर १८२३)
१९४४ : हेलन व्हाईट डॉक्टरेट मिळवणारी पहिली अमेरिकन महिला (जन्म: २८ नोव्हेंबर १८५३)
२००२ : एच अँड एम चे संस्थापक इर्लिंग पर्स्सन यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९१७)
२०१० : ग्रीनलँड देशाचे पहिले पंतप्रधान जोनाथन मोट्झफेल्ड यांचे निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९३८)
२०१३ : भारतीय लेखक राजेंद्र यादव यांचे निधन. (जन्म: २८ ऑगस्ट १९२९)

## भुईमूग पिवळा पडण्याची समस्या व उपाययोजना



बीड - भुईमूग पिकात पिवळेपणा दिसत असल्याने शेतकऱ्यांचे मन चिंतेत आहे. या समस्येचे कारण मुख्यतः पावसाळ्यातील सततचा पाऊस आणि जमिनीतील चुनीखडी (कॅल्शियमयुक्त) प्रमाण जास्त असणे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. पिकाची पाने पिवळी पडणे हे लक्षण मुख्यतः लोह (ऋश), मॅग्नेशियम (चस), मोलिब्डेनम (चे) यांसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे दिसून येते.

**समस्या आणि कारणे**

सततचा पाऊस मुळे मुळांना आवश्यक ऑक्सिजन मिळत नाही, ज्यामुळे मुळांचे कार्य प्रभावित होते. चुनीखडी जमिनीत पाचक कि जास्त असल्याने लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत, परिणामी पिकाची वाढ मंदावते. शेतकऱ्यांनी निरीक्षण केले आहे की, पिकाच्या जुन्या पानांचे पिवळसर होणे, पाने कोरडी पडणे आणि नवीन पानांचे पिवळेपणा हे समस्येचे लक्षण आहे.

**उपाययोजना**

तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी खालील उपाययोजना अवलंबावी, ज्यामुळे भुईमूग पिकाची गुणवत्ता सुधारता येईल.

**१. फवारणीद्वारे उपाय:**

फेरस सल्फेट (ऋशडज) - ०.५% (५०० ग्रॅम/१०० लिटर पाणी)

सायट्रिक ॲसिड - ५० ग्रॅम/१०० लिटर पाणी

युरिया - १% (१ किलो/१०० लिटर पाणी)

हे मिश्रण ७-१० दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारावे, ज्यामुळे पाने हिरवी राहतात आणि पिकाला वाढीस चालना मिळते.

**२. पाणी निचरा सुधारणा:**

सततच्या पावसामुळे जमिनीत पाणी साचत असल्यास पिकावर नकारात्मक परिणाम होतो. यासाठी नाली पद्धतीने पाणी वाहून नेण्याची सोय करावी, जेणेकरून मुळांना पुरेसा ऑक्सिजन मिळेल.

**३. जमिनीचा कि संतुलित करणे:**

जमिनीचा कि ७.५ पेक्षा जास्त असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत. अशावेळी सेंद्रिय घटक जसे की कंपोस्ट किंवा गांडूळ खत वापरल्यास कि संतुलित होतो. याशिवाय झिंक, फेरस आणि मॅग्नेशियमसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पाने फवारणीने द्यावी.

**४. मृदा परीक्षण:**

शेतकऱ्यांनी मृदा तपासणी करून नेमकी कोणती अन्नद्रव्ये कमी आहेत ते निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे योग्य खत आणि फवारणी करता येईल.

**५. जैविक उपाय:**

बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम व झडइ कल्चर वापरल्यास मुळांची वाढ आणि आरोग्य सुधारते. ट्रायकोडर्मा व जीवामृत/जिवाणू खत वापरल्यास मुळांची कार्यक्षमता वाढते आणि पिकाची उत्पादनक्षमता सुधारते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, भुईमूग पिकात पिवळेपणा दिसल्यावर लवकर उपाय करणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते. शेतकऱ्यांनी या उपाययोजना पाळून पिकाचे आरोग्य सुधारावे, असे त्यांनी सांगितले आहे.

## पिकांसाठी औषध फवारणी करताना 'या' चुका अजिबात करू नका!

बीड - भारतातील शेतकऱ्यांसाठी पिकांची काळजी घेणे आणि कीटक, रोग यांचा प्रभाव कमी करणे अत्यंत महत्त्वाचे असले तरी, औषध फवारणी करताना अनेक चुका होत असल्याचे तज्ज्ञांनी निदर्शनास आणले आहे. चुकीच्या पद्धतीने फवारणी केल्यास पिकांची गुणवत्ता कमी होते, कीटकनाशकांवर प्रतिकारशक्ती वाढते, पर्यावरणाला धोका निर्माण होतो आणि शेतकऱ्यांचे आरोग्यही धोक्यात येते.

**औषध फवारणी करताना सर्वात सामान्य चुका**

१. अंदाजाने औषध मोजणे, शेतकऱ्यांमध्ये बर्याचदा ही सवय आढळते की औषध अंदाजानेच टाकले जाते - दरवेळी इतकंच टाकतो किंवा शेजाऱ्याने सांगितलंय अशी पद्धत., परिणाम: पिकांना नुकसान, अवांछित रासायनिक अवशेष राहणे, खर्चात अनावश्यक वाढ., उपाय: कंपनीच्या शिफारशी प्रमाणे औषधाचे डोस मोजणे आवश्यक आहे. मोजमाप ही वैज्ञानिक प्रक्रिया आहे, याचे शेतकऱ्यांनी भान ठेवावे.

**२. कोणतंही पाणी वापरणे**

थेट विहिरीचे पाणी किंवा साठलेले पाणी वापरणे ही सामान्य चूक आहे. परिणाम: औषध योग्यरित्या विरघळत नाही, परिणामकारकता कमी होते, ड्रिप किंवा स्प्रे नोजल अडकतात. उपाय: फवारणीसाठी स्वच्छ आणि शुद्ध पाणी वापरा. पीएच लेव्हल तपासून योग्य पाणी निवडा.

**३. एकाच औषधाचा वारंवार वापर**

सतत एकच कीटकनाशक किंवा बुरशीनाशक वापरणे., परिणाम: कीटक आणि रोगांना औषधाचा प्रतिकार निर्माण होतो, औषधाचा परिणाम हळूहळू शून्यावर येतो. उपाय: औषधांची फेरपालट (Rotation of molecules) करावी, विविध प्रकारची औषधे डॉक्टर किंवा तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार वापरा.

**४. सुरक्षेची दुर्लक्ष**

फवारणी करताना मास्क न घालणे, हात न धुऊन जेवण करणे, चप्पल घालणे ही गंभीर चुका आहेत.,



परिणाम: कीटकनाशक त्वचेद्वारे शरीरात प्रवेश करतात, गंभीर आजार किंवा दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होतात., उपाय: फवारणी करताना झझए किट, मास्क, हातमोजे, गॉगल्स वापरा. फवारणीनंतर हात-पाय, कपडे स्वच्छ धुवा.

**५. हवामानाचा विचार न करणे**

वारंवार फवारणी करताना वारा, पाऊस, उष्णतेचा विचार न करणे., परिणाम: औषध उडून जाते, खर्च वाढतो, परिणाम मिळत नाही. उपाय: थंड, कमी वाऱ्याचा दिवस निवडा. सकाळी किंवा संध्याकाळी फवारणी करा.

**विशेष सूचना**

औषध विकत घेताना कंपनी, मॅन्युफॅक्चरिंग आणि एक्सपायरी डेट, सर्टिफिकेट किंवा इखड मार्क तपासा. बाजारात अनेक खोट्या कंपन्यांची औषधे उपलब्ध आहेत, त्यामुळे भ्रांत उत्पादनांपासून सावध राहा. शक्यतो सेंद्रिय किंवा बायोलॉजिकल फवारणीचे प्रमाण वाढवा. यामुळे पिकांची गुणवत्ता टिकते आणि शेतकऱ्यांचे आरोग्य सुरक्षित राहते.

**तज्ज्ञांचा सल्ला:** औषध फवारणी ही फक्त पिकांचे संरक्षण नाही, तर शेतकऱ्यांचे आरोग्य आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रक्रिया आहे. योग्य पद्धती अवलंबून शेतकऱ्यांना सुरक्षित, फायदेशीर आणि परिणामकारक शेती करता येते.

## सेंद्रिय शेतीत बदल घडवणारा उपाय जीवामृत ट्यूब

बीड - सेंद्रिय शेती ही फक्त पर्याय नव्हे तर काळाची गरज बनली आहे. रासायनिक खतांमुळे जमिनीत जीवसृष्टी नष्ट होत आहे, सुपीकता कमी होत आहे आणि उत्पादनाचा खर्च वाढत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळत आहेत, मात्र जीवामृताची योग्य निर्मिती हा मोठा आव्हान ठरतो.



हीच समस्या लक्षात घेऊन विकसित करण्यात आले आहे झीसीर्शीीळींश जीवामृत ट्यूब. हे एक अभिनव तंत्रज्ञान आहे, ज्यामुळे शेतकरी कमी वेळ, कमी मेहनत आणि कमी खर्चात अधिक गुणवत्तापूर्ण जीवामृत तयार करू शकतो.

**जीवामृत का आवश्यक आहे?**

जीवामृत हे नैसर्गिक खत असून जमिनीत सूक्ष्मजीवांची संख्या वाढवते. हे सूक्ष्मजीव मातीतील पोषकतत्त्वांचा विघटन वेग वाढवतात, ज्यामुळे पिकांना पोषण सहज मिळते. परिणामी मुळे अधिक बळकट होतात, पाने हिरवी राहतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि उत्पादनाचा दर्जा सुधारतो.

**पारंपरिक पद्धतीची समस्या**

पारंपरिक पद्धतीने जीवामृत तयार करताना वेळ, जागा, सतत देखरेख आणि योग्य प्रमाण राखणे यासारख्या अडचणी येतात. झीसीर्शीीळींश जीवामृत ट्यूब कशी काम करते ट्यूबमध्ये जीवनसत्त्वांनी आणि सूक्ष्मजीवांनी समृद्ध जीवामृत तयार होते. फक्त १०-१२ दिवसांत दर्जेदार जीवामृत तयार होते. तयार जीवामृत ड्रीप सिंचन, फवारणी किंवा पाट पाण्यातून सहज वापरता येते.

**वापराचे फायदे**

कमी वेळेत अधिक प्रमाणात दर्जेदार जीवामृत तयार होणे. रासायनिक खतांवरील अवलंबन कमी होणे., जमिनीचा पोत सुधारणे, भुसभुशीतता वाढवणे., पीक मुळे अधिक बळकट होणे, पोषणतत्त्वांचे शोषण सुधारणे., पिकांची प्रतिकारशक्ती वाढणे, रोग व कीटकांपासून नैसर्गिक संरक्षण.

**शेतात झालेली बदल**

पिकांच्या उत्पादनात सरासरी १५-२०% वाढ., रासायनिक खतांवरील खर्च ४०-६०% कमी., मातीची सुपीकता आणि पाणी धारण क्षमता वाढली., फळांचा आकार, चव आणि रंग सुधारला., रासायनिक फवारणी कमी, पर्यावरणीय तणाव कमी.

**ट्यूबची वैशिष्ट्ये**

विविध आकार व मॉडेल्स उपलब्ध., ९०० GSM प्लास्टिकपासून बनवलेली, ऊन, पाऊस, वारा आणि बुरशीपासून सुरक्षित. , डास, माश्या किंवा दुर्गंधीचा त्रास नाही.,१००% वॉटरप्रूफ, ३ वर्षांची वॉरंटी. खडज सर्टिफाईड, उष्णतेपासून बॅक्टरियाचा बचाव करणारी, ब्लॉकेज न होणारी एकमेव ट्यूब.

**शाश्वत शेतीसाठी पर्याय**

झीसीर्शीीळींश जीवामृत ट्यूब केवळ साधन नाही, तर शेतकऱ्यांसाठी शाश्वत शेतीकडे नेणारा विश्वासाचा दुवा आहे. यामुळे शेतकरी कमी खर्चात, कमी मेहनतीत उत्पादन वाढवू शकतो, रासायनिक खतांवरील अवलंबन कमी करू शकतो आणि पर्यावरणास अनुकूल योगदान देतो.

## मृग बहार डाळिंबाची फळवाढ आणि व्यवस्थापन

मृग बहार डाळिंब पिकात फळवाढ आणि पक्वता याचे व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

बागेची मशागत : फळबागेतून पाण्याचा संपूर्ण निचरा करावा. पावसामुळे झाडांच्या मुळांच्या जवळ पाणी साचलेले नाही, याची काळजी घ्यावी. पाणी साचून राहिल्यामुळे मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. फळांनी भरलेल्या फांद्यांना आधार देण्यासाठी योग्य प्रकारे स्टेकिंग किंवा काठीचा आधार करावा. फळांची योग्य वाढ होण्यासाठी व चांगले वजन मिळवण्यासाठी गुच्छामधील जास्त आणि गरजेपेक्षा अधिक फळे काढावीत. पाच वर्षाच्या झाडासाठी प्रति झाड सुमारे ८० ते १०० फळे घ्यावीत. जास्त आर्द्रतेमुळे फळे गळण्याची समस्या उद्भवू शकते. तसेच फळांची परिपक्वता होण्यासाठी आणि चांगला रंग येण्यास थोडा विलंब होऊ शकतो म्हणून पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. लवकर मृग बहार घेतलेल्या बागेमध्ये फळ पूर्ण पक्व होऊन सालीचा व दाण्यांचा रंग विकसित झाला असल्यास, फळगळ आणि बुरशीचे डाग टाळण्यासाठी वेळेत फळ तोडणी करावी.

अन्नद्रव्य व्यवस्थापन : ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ६ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून १५-२० दिवसांचा अंतराने तीन फवारण्या कराव्यात. ६ ग्रॅम मॅंगनीज सल्फेट प्रति लिटर पाण्यात मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. ०-५२-३४ (मोनो पोटॅशियम फॉस्फेट) ५.१२ किलो, यूरिया १२.५६ किलो आणि ०-०-५० (पोटॅशियम सल्फेट) ४.६ किलो प्रति एकर



याप्रमाणे आठवड्याच्या अंतराने दहा वेळा ड्रीपद्वारे द्यावे.

## उन्हाळी मूग लागवड तंत्रज्ञान

बीड - उन्हाळी मुगाची लागवड ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असून योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ करता येते. उन्हाळ्यातील पीकाला चांगले सूर्यप्रकाश व उष्ण हवामान मिळते, ज्यामुळे पिकाची वाढ जलद होते, रोग व कीटकांचा प्रादुर्भाव कमी होतो आणि उत्पादनाचे प्रमाण व दर्जा सुधारतो. या काळात पिकांची योग्य काळजी घेतल्यास शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या फायदा होतो.

**उन्हाळी मुगाची लागवड - वेळ व पद्धत**

उन्हाळी मुगाची पेरणी २० फेब्रुवारी ते १५ मार्च या दरम्यान करावी. उशिरा पेरणी केल्यास पावसाळ्याच्या पाण्याने पीक सापडण्याची शक्यता असते, त्यामुळे वेळेवर पेरणी करणे गरजेचे आहे.

पेरणी पद्धत: दोन चाड्याच्या पाभरीने पेरणी करावी., ओळी व अंतर: दोन ओळींत ३० सेंमी आणि दोन रोपांत १० सेंमी अंतर ठेवा., बीज प्रमाण: हेक्टरी १५-२० किलो; घरचे बियाणे असल्यास दर ३ वर्षांनी बदलावे.

**जमीन व पूर्वमशागत**

उन्हाळी मुगासाठी मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारी जमीन योग्य असते. पाणथळ, क्षारपड किंवा हलक्या जमिनीत पेरणी टाळावी. रब्बी पिकाची काढणी नंतर जमिनीवर पडलेले अवशेष, पालापाचोळा वेचून जमीन स्वच्छ करावी. जमिनीची खोल नांगरटण करून दोन पाळ्या कुळव द्याव्यात, शेवटच्या पाळीत ५-१० टन कुजलेले शेणखत मिसळावे.

**बीजप्रक्रिया**

पिकाची उगवण सुधारण्यासाठी व बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी बीजप्रक्रिया महत्त्वाची आहे., पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया: प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम थायरम किंवा २.५ ग्रॅम कार्बेन्डाझीम., उगवण सुधारण्यासाठी: प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा., मुळावरील पोषणासाठी: रायझोबियम व पीएसबी २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास.

**फायदे:**

ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण., रायझोबियममुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता सुधारते.

**खत व्यवस्थापन**

पेरणीपूर्वी: हेक्टरी ५ टन कुजलेले शेणखत व कंपोस्ट. पेरणीवेळी: हेक्टरी २० किलो नत्र, ४० किलो स्फुरद (उदा. ४४ किलो युरिया व २५० किलो डड्झ किंवा १०० किलो ऊ-झ)., एमओपी: १५-२० किलो, उत्पादनात



वाढीसाठी., विद्रांव्या खतांची फवारणी, फुलोऱ्यांवर: २% युरिया (२० ग्रॅम/लिटर पाणी)., शेंगा भरण्याच्या वेळी: २% ऊ-झ (२० ग्रॅम/लिटर पाणी)., आंतरमशागत, पेरणीनंतर १५-२० दिवसांनी हलकी डवरणी., आवश्यकतेनुसार १०-१२ दिवसांनी खुरपणी., पेरणीपासून ३०-३५ दिवस पर्यंत शेत ताण विहरीत ठेवावे.

**पाणी व्यवस्थापन**

पेरणीपूर्वी एक पाणी द्यावे; वापस्यावर आल्यानंतर पेरणी करावी., पेरणीनंतर पहिल्या ३-४ दिवसांनी हलके पाणी द्यावे., त्यानंतर जमिनीच्या मगदुरानुसार व पिकाच्या गरजेनुसार पाणी द्यावे., संपूर्ण पीक कालावधीत ५-६ पाण्याच्या पाळ्या, विशेषतः फुलोऱ्या व शेंगा भरण्याच्या काळात पिकास पाण्याचा ताण पडू नये.

**अपेक्षित उत्पादन**

वरील प्रमाणे सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उन्हाळी मुगाची जातीपरत्वे ४-५ क्विंटल प्रति एकरी उत्पादन मिळवता येऊ शकते.

**तज्ज्ञांचे मत**

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की उन्हाळी मुगाची लागवड योग्य पद्धतीने केल्यास पीक फुलोऱ्या आणि शेंगा भरण्याच्या काळात रोग आणि कीटकांचा प्रादुर्भाव कमी राहतो. तसेच उत्पादनाचे प्रमाण व दर्जा सुधारतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या फायदा होतो. सुरक्षित आणि दर्जेदार उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन, पाणी व आंतरमशागत यांचा योग्य अवलंब करणे आवश्यक आहे.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत






# एप्रिलअखेर एक टीपरुही गाळपाविना राहणार नाही -सतीश घाटगे

## गाळप हंगामाला प्रारंभ: १० हजार मे. टन क्षमतेच्या दुसऱ्या युनिटसह -२४ मेगावॅट प्रकल्पाची पायाभरणी

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी उसाच्या राजकारणातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मुक्त करण्यात यशस्वी ठरलेल्या समृद्धी साखर कारखान्याने १० हजार मे. टन क्षमतेच्या दुसऱ्या युनिटसह २४ मेगावॅट को-जनरेशन प्रकल्पाची पायाभरणी करून 'समृद्धी'च्या दुसऱ्या पर्वाची मुहूर्तमेढ रोवली. रविवारी गाळप हंगाम २०२५-२६ च्या बॉयलर अग्निप्रदीपन कार्यक्रमात, १० हजार मे. टन क्षमतेच्या दुसऱ्या युनिटसह २४ मेगावॅट को-जनरेशन प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ संत-महंत आणि हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. शेतकऱ्यांना उसाची चिंता करू नका, एप्रिलअखेर उसाचे टीपरुही गाळपाविना राहणार नाही. अशा शब्दात कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

या कार्यक्रमास समृध्दी कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी, बळीराम महाराज राठोड, सुरेश महाराज रामदासी, योगीराज कैलासनाथ महाराज, सतीश महाराज जाधव, घृष्णेश्वर कारखान्याचे संचालक सतीशराव चव्हाण, प्रभाकर पवार, एकनाथराव दुधे, अंकुशराव उढाण, मार्केट कमिटीचे उपसभापती अरुण घुगे, संचालक बालाजी खोजे, शिवाजीराव कटारे, पांडुरंग भांगे, भाजपा तालुका प्रमुख शिवाजी मोरे, नामदेव ढाकणे, भगवान बर्वे,अनिरुद्ध झिंजुर्डे, नकुलजी तनपुरे, भगवानराव घाटूळ, बाळासाहेब बोरकर, संचालिका वैशालीताई घाटगे, रिंकीताई मेठी, ज्येष्ठ संचालक दिलीप मामा फलके, रणजीत उढाण, अभिजित उढाण, विकी शिंदे, जीवनराव वगरे , जीवन वगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.*



घनसावंगी-अंबड परिसरात अतिरिक्त उसाचा प्रश्न दरवर्षी चिंतेची बाब बनतो. ऊस उत्पादक शेतकरी राजकारणाचा बळी पडत असल्याने हा प्रश्न कायमचा मिटवून शेतकऱ्यांना भयमुक्त करण्यासाठी समृद्धी साखर कारखान्याने आपली क्षमता दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार १० हजार मे. टन क्षमतेच्या दुसऱ्या युनिटसह २४ मेगावॅट को-जनरेशन प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. हे दोन्ही प्रकल्प एका वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे आणि व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी करणार आहेत. "ऊस उत्पादक शेतकरी आमच्यासाठी विठ्ठल आहेत. समृद्धी कारखाना खाजगी असला तरी त्याचे खरे मालक शेतकरीच आहेत. निवडणुका येतात-जातात, पण समृद्धी साखर कारखाना उसाचे राजकारण करत नाही, आणि करणारही नाही. कारण हा कारखाना माझं तिसरं अपत्य आहे. तो कष्टकरी कामगार- शेतकऱ्यांचे प्रेम,विश्वास आणि कष्टातून उभा राहिला आहे," असे सतीश घाटगे यांनी स्पष्ट केले .

समृध्दी मराठवाड्यात सर्वाधिक भाव देणारा कारखाना म्हणून उदयास येईल

"समृध्दी साखर कारखाना मराठवाड्यात सर्वाधिक भाव देणारा दुसऱ्या क्रमांकाचा कारखाना आहे. मागील वर्षी २९०० तर यावर्षी समृद्धीने २९७० रुपये एवढा उच्चांकी भाव दिला. येणाऱ्या काळात स्व:ताचा विक्रम मोडून समृध्दी कारखाना मराठवाड्यातला सर्वाधिक भाव देणारा कारखाना म्हणून उदयास येईल, असा आमचा ठाम विश्वास आहे. शेतकऱ्यांनी ऊस गाळपाची घाई करू नये, बाहेरच्या कारखान्याला ऊस देऊन आर्थिक नुकसान करू नये" असे माझे आवाहन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना राहील.

-सतीश घाटगे , चेअरमन समृद्धी शुगर्स लि.

# दीपावली व पाडवा स्नेहमिलन सोहळा उत्साहात

जालना । प्रतिनिधी

रामनगर येथील ओम मंगल कार्यालयात श्री. शिवादादा शेजुळ यांच्या पुढाकाराने आज दि २६ ऑक्टोबर रोजी दीपावली व पाडवा स्नेह मिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




यावेळी कैलाशजी गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उत्तम अण्णा शेजुळ, ह.भ.प. गणेश महाराज कोल्हे, ह.भ.प. कैलाश महाराज ठोंबरे, तुकाराम पाटील शेजुळ, प्रभाकर शेजुळ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, सरचिटणीस सुनील पवार, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, विष्णुबापू डोंगरे, कैलाश उबाळे, दिलीपराव मोहिते आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

माजी आमदार श्री. कैलाशजी गोरंट्याल म्हणाले "सण-उत्सव ही आपल्या सामाजिक जीवनाची ताकद आहे. अशा स्नेहमिलनातून आपला भावनिक बंध दृढ होतो. समाजातील प्रत्येक घटकाने एकात्मतेची भावना जपत विकासाच्या वाटचालीत हातभार लावला पाहिजे. रामनगर येथे शिवादादा शेजुळ यांनी आयोजित केलेला उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहे. भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले शिवादादा शेजुळ यांनी समाजाला एकत्र आणण्यासाठी घेतलेला हा उपक्रम स्तुत्य आहे तसेच "दीपावली म्हणजे प्रकाशाचा उत्सव. हा प्रकाश फक्त दिव्यांमध्ये नसून मनामनात पसरला पाहिजे. आपण सर्वांनी एकमेकांना साथ देत समाज विकासासाठी कटिबद्ध राहिले तर विकास अधिक वेगाने होईल. सर्वांना दीपावली व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा. यावेळी रामनगर व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नुतन वसाहत खुन प्रकरणी आरोपी अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

जालना । प्रतिनिधी

जालना शहरात नुतन वसाहत येथील रहिवासी विकास प्रकाश लोंढे हा लग्नावरुन घरी जात असतांना गुन्ह्यातील आरोपीतांनी संगणमत करुन रस्त्यात अडवुन जुन्या वादाच्या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करुन रॉड व लाकडी दांड्?याने बेटम मारहान करुन खुन केला होता.

त्याअनुषंगाने सदर घटना घडताच स्थानिक शाखेचे पथके आरोपीतांचा शोध घेत असतांना आरोपी हा नाशीक येथे रेल्वे स्टेशन परिसरात थांबलेला आहे. अशी



खबऱ्यामार्फत व तांत्रीक विश्लेषनाद्वारे माहिती मिळाल्याने नाशिक गुन्हे शाखेस संपर्क करुन आरोपीताचे वास्तव्य असलेले ठिकाण सांगुन ताब्यात घेणेबाबत कळवुन खाजगी वाहनाने तात्काळ नाशिक येथे जाऊन आरोपीस ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि सचिन स्वाममळ, पोउपनि राजेंद्र वाघ, सपोउपनि / रामप्रसाद पव्हरे, पोडवा प्रभाकर वाय, रमेश राठोड, ईरशाद पटेल, सागर बाविस्कर, संदीप चिंचोले, रमेश काळे यांनी केली आहे.

# युसूफवडगाव विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा २० वर्षांनी स्नेहमेळावा




युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात काल सन २००५-२००६ वर्षातील १०वीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल २० वर्षांनी स्नेह मेळावा अतिशय उत्साहात संपन्न झाला.

युसूफवडगांव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात काल सन २००५-२००६ वर्षातील १०वीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा गेटु गेदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अंकुश भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणुन विद्यालयाचे माजी प्राचार्य लक्ष्मण जाधव,माजी पर्यवेक्षक प्रमोद तेरखेडकर,माजी प्राध्यापक सोमनाथ कोरसळे,माजी पर्यवेक्षक राजाभाऊ खरबड,माजी पर्यवेक्षक व्यंकटेश शिंदे हे उपस्थित होते.तब्बल २० वर्षानंतर एकत्रीत आलेल्या मित्र-मैत्रिणींनी जुन्या आठवणी उजाळा दिला.यावेळी माजी विद्यार्थी व शिक्षकांनी संवाद साधत वर्गातील व शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला शालेय जिवनातील आठवणी या कायम आपल्या पाठीशी असतात आपण किती मोठे झाले तरी आपण आपल्या शालेय जिवनातील व वर्गातील मित्रांना कधीच विसरत नाहीत अशी भावना प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी यावेळी बोलताना मांडली. वीस वर्षांनी त्याच वर्गातील व शाळेतील आपल्या वर्ग मित्रमैत्रिणी व शालेय शिक्षकांना भेटुन मनस्वी आनंद झाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले.कार्यक्रमाचा शेवट हा जेवणाने झाला यावेळी ज्योत्स्ना गालफाडे, अश्विनी डिकुळे,प्रज्ञा कुलकर्णी,पल्लवी थळकरी,स्नेहा लामतुरे,चंद्रकांत भूमकर,सुभाष पारेकर,अजय राऊत,सचिन थळकरी,महेश खानवरे,गणेश कोरसळे,अविनाश थळकरी,सुरज मुकदम,विजयकुमार तुपे,श्रीराम राऊत,मकरंद वाळकेश्रीराम लोकरे, वैजनाथ जाधव,किरण जावळे, भैरवनाथ इंगळे व महेश लामतुरे हे उपस्थित होते.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी घेतला विविध विषयांचा आढावा

## नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये

जालना । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे अथवा पुरांमुळे बाधित झालेला जिल्ह्यातील एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही याची काळजी प्रशासनाने घ्यावी अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा बैठकीत दिल्या.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, जि.प. चे अति मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी श्रीमती मुंडे म्हणाल्या,



अतिवृष्टीमुळे अथवा पुरांमुळे शेती पिकांचे नुकसानाचे सविस्तर पंचनामे सर्व्हे करुन, सादर केलेल्या अहवालानुसार जिल्ह्यासाठी मागणी करण्यात आलेले अनुदान ३ ते ४ दिवसात उपलब्ध होईल. तसेच अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत निधीची मागणी करण्यात यावी.तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जीवनावश्यक बाबींसाठी जिल्हा नियोजन अंतर्गत निधी उपलब्ध करुन विविध विकासकामे करण्यात येणार आहे. यामध्ये अंगणवाडी, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्मशानभूमी यांच्याकडे जाणाऱ्या रस्त्यांचे काम प्राधान्य करण्यात येणार आहे. याबरोबरच पुरामुळे गावामधील अनेक जमीनी वाहून गेल्याने शेतकऱ्यांना रोजगार मिळण्यासाठी जमीन खोलीकरण व रुंदीकरणाची कामे रोजगार हमी योजनेतून केल्यास लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच बंधारा दूरुस्ती, ओढे, नदी-नाले यांचे खोलीकरण, वीजेचे अनेक पोल पडलेले असून त्याची दुरुस्तीची कामे, शाळा खोल्यांची दूरुस्ती करणे, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील चौका-चौकात सोलार हायमॅक्स लाईट लावून गावातील चौक प्रकाशित करणे असे विविध विकास कामे पालकमंत्री आणि आमदार निधीतून करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेचे तयारी करता यावी, याकरीता नाविन्यपूर्ण योजनेतून प्रत्येक तालूक्यात विविध सोयी सुविधा असलेले वाचनालय तसेच अभ्यासिका तयार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. जालना शहराच्या सर्वांगिण विकासाकरीता तसेच सुशोभीकरणांसाठी फेस लिफ्ट उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. या उपक्रमातंर्गत शहरातील रस्त्यांचे रुंदीकरण, चौकांचे सुशोभिकरण, उद्यान तयार करणे, तलावाशेजारी वॉकींग ट्रॅक तयार करणे आदी विविध विकासकामांचा समावेश असणार असल्याची माहिती यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिली.जिल्ह्यात नुकतीच पोलीस पाटील भरती प्रक्रिया पार पडली असून या भरती प्रक्रियेतून ५५४ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती प्रकिया अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पाडली याकरीता श्रीमती मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले.

# दोन महिन्यापासून फरार असलेला आरोपी जेरबंद

जालना । प्रतिनिधी

पोलीस निरीक्षक यांच्या दुर्लक्षामुळे तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये वारंवार गुन्हे करुन दहशत निर्माण करणाऱ्या आरोपी विरुध्द कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या.

तालुका पोलीस ठाणे मध्ये अशोक भोसले, गोकुळवाडी येथे फिर्यादीच्या घराचे नुकसान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याबददल तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६६३/२०२५ कलम ११५(२), ३२४(२), १९१(२), १९१(१), १८९(४), १८९(२) भा.न्यां.स. अन्वये लक्ष्मण गोरे व त्याचे साथीदारांविरुध्द गुन्हा दाखल आहे. परंतु तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांना आरोपी सापडत नसल्याने सदरील आरोपी पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखे पोलिसांनी पथक तयार करून आरोपी पकडला

तसेच कृष्णा भोपळे,यांना दिनांक १९/०८/२०२५ रोजी वाघूळ घाट, जालना येथे आरोपी लक्ष्मण गोरे याने मारहाण करुन, शिवीगाळ व धमकी दिल्याबददल तालुका पोलीस ठाणे गु.र.क्र.५५०/२०२५ कलम ३५१(२),३५२, ११५(२), ११८(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे.

तसेच फिर्यादी श्रीमती कल्याणी गजानन तौर रा. शिवनगर, यांचे इंस्टाग्राम आयडीवरुन मयत गजानन तौर याची बदनाम करण्याच्या उददेशाने पोस्ट पाठविल्या प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द दि.०५/०८/२०२५ रोजी सायबर पोलीस ठाणे गु.र.क्र.१७/२०२५ कलम ३३६(२) भा.न्यां.स. सह कलम ६६ (क) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल होता ज्यामध्ये आरोपी लक्ष्मण गोरे हा तांत्रिक तपासामध्ये निष्पन्न आरोपी आहे. वर नमूद गुन्हयांमध्ये आरोपी लक्ष्मण किसन गोरे, रा. गोकुळवाडी, जालना हा मागील ०२ महिन्यापासुन फरार होता. त्यास मागील ०२ महिन्यापासून तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदाराच्या मदतीने तो जळगांव येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २५/१०/२०२५ रोजी जळगांव येथे जावून त्यास ताब्यात घेण्यात आले.

आरोपी लक्ष्मण किसन गोरे याकडे तो वापरत असलेल्या गावठी कट्ट्याचाबत विचारणा करता त्याने त्याच्याकडील गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुस हे आतिष प्रकाश पाटोळे रा. पिवळाबंगला, जालना यास विकले असल्याचे चौकशीत कळाल्याने आतिष प्रकाश पाटोळे यास दिनांक २५/१०/२०२५ रोजी पाठक मंगल कार्यालय, जालना येथून ताब्यात घेतले असता त्याकडे रु.३०,२००/- किमतीचा एक गावठी बनावटीचा कट्टा व दोन जिवंत काडतुस मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आले आहे. आतिष प्रकाश पाटोळे याने सदरचे गावठी पिस्टल एक महिन्यापासुन त्याच्या मित्र कुलदीप ऊर्फ जज्या जगधने याकडे ठेवली होती त्याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. तरी कदीम पोलीस ठाणे येथे पोउपनि, राजेंद्र वाघ यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि, योगेश उबाळे, सपोनि, सचिन खामगळ, पोउपनि, राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार रामप्रसाद पव्हरे, गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिचोले, सतिष श्रीवास, रमेश काळे यांनी केली आहे.

## जाहीर नोटीस

### मे. उपविभागीय अधिकारी संगमनेर यांचे कोर्टात
### आर.टी. एस. अपील नं.४९/२०२५

दत्तु उर्फ दत्तात्रय बाबुराव ढोले, वगैरे -अपेलंट
विरुध्द
सुशिला नंदकिशोर मनियार, वगैरे -रेस्पॉडंट
प्रति,

रेस्पॉ नं. २) ज्योती प्रदिप सारडा, रा. हांडेकर शाळेजवळ, स.नं. ३३३, "रामरूप", ज्योती सोसायटी, सहकार नगर, पुणे सिटी, ता.जि. पुणे ४११ ००९, रेस्पॉ नं. ३) शामसुंदर नंदकिशोर मनियार, रा. सुनंदन बंगला, जाणता राजा मैदानाजवळ, स्वप्न नगरी गल्ली नं. १, शिवाजी नगर, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर, नं. १०) अरुणा जयप्रकाश मानधने, रा. जयप्रकाश मानधने, श्री. निवास, नविन मोंढा, ता. माजलगाव, जि. बिड ४३१ १३१, रेस्पॉ नं. ११) शोभा वल्लभ बगला, रा. नंदन अहिंसा नगर, जालना रोड, प्लॉट नं. ५०, संभाजी नगर, ता. जि. संभाजी नगर, ४३१ ००५.

यात अपेलंट यांनी मे. उपविभागीय अधिकारी सो संगमनेर यांचे कोर्टात आर.टी.एस. अपील नं. ४९/२०२५ हे अपिल दाखल केले आहे. सदर अपिलातील नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तुमचे म्हणणे देणेकामी मे. उपविभागयी अधिकारी सो संगमनेर यांचे कोर्टात उपस्थित रहावे.

तुम्हाला अशी जाहिर नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिवशी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुउपस्थितीत सदर अपिलाची सुनावणी केली जाईल व त्याचा निर्णय दिला जाईल.

आज दि. १३/१०/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

स्वाक्षरित/-
उपविभागीय अधिकारी
संगमनेर भाग, संगमनेर

## जाहीर नोटीस

### मे. उपविभागीय अधिकारी संगमनेर यांचे कोर्टात
### आर.टी. एस. अपील नं.३७७/२०२५

दत्तु उर्फ दत्तात्रय बाबुराव ढोले, वगैरे -अपेलंट
विरुध्द
सुशिला नंदकिशोर मनियार, वगैरे -रेस्पॉडंट
प्रति,

रेस्पॉ नं.२) ज्योती प्रदिप सारडा, रा. हांडेकर शाळेजवळ, स.नं. ३३३, "रामरूप", ज्योती सोसायटी, सहकार नगर, पुणे सिटी, ता.जि. पुणे ४११ ००, रेस्पों नं. ९ पुष्पा रमेश भुतडा, रा. गायकवाड प्रॉपट्रीज, हार्टबिट्स, मगरपट्टा सिटी रोड, भोसले गार्डनजवळ, पुणे शहर, ता. जि. पुणे ४११०२८, रेस्पॉ नं. १० अरुणा जयप्रकाश मानधने, रा. जयप्रकाश मानधने, श्री. निवास, नविन मोंढा, ता. माजलगाव, जि. बिड ४३१ १३१.

यात अपेलंट यांनी मे. उपविभागीय अधिकारी सो संगमनेर यांचे कोर्टात आर.टी.एस. अपील नं. ३७७/२०२४ हे अपिल दाखल केले आहे. सदर अपिलातील नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि. १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तुमचे म्हणणे देणेकामी मे. उपविभागयी अधिकारी सो संगमनेर यांचे कोर्टात उपस्थित रहावे.

तुम्हाला अशी जाहिर नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिवशी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केलयास तुमच्या अनुउपस्थितीत सदर अपिलाची सुनावणी केली जाईल व त्याचा निर्णय दिला जाईल.

असे. आज दि. १३/१०/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

स्वाक्षरित/-
उपविभागीय अधिकारी
संगमनेर भाग, संगमनेर

# सरकारने कोणालाही वाचवण्याचा प्रयत्न करू नये

## महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणी काँग्रेस नेत्या खा.प्रणिती शिंदे यांची एसआयटी स्थापन करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

महिला डॉक्टर संपदा मुंडेंच्या आत्महत्या प्रकरणी सरकारने कोणालाही पाठीशी घालू नये. एकाला वाचवण्यासाठी दुसऱ्याचा बळी देऊ नये. महाराष्ट्रामध्ये अनेक महिला डॉक्टरांना दबाव आणून चुकीचे काम करण्यास भाग पाडले जात आहे. अशा सर्व प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी यासाठी सरकारने एसआयटी स्थापन करावी आणि ती पुरावे नष्ट होण्या अगोदर करावी. अशी मागणी काँग्रेस नेत्या खा. प्रणिती शिंदे यांनी बीडमध्ये बोलताना केली. प्रणिती शिंदे यांनी वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे जाऊन डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्या प्रश्न प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या



यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की महाराष्ट्र मध्ये महिला डॉक्टरांच्या बाबतीत अनेक वेळा दबाव आणून चुकीचे काम करून घेतले जाते. अशा अनेक घटना आहेत. डॉक्टर संपदा मुंडे यांच्या बाबतीतही असेच घडले असावे. डॉक्टर संपदा मुंडे यांना रात्री पोस्टमार्टम करायला लावून या पोस्टमार्टम चा चुकीचा रिपोर्ट देण्यासाठी दबाव आणला जात होता अशी माहिती आहे. आज महाराष्ट्रामध्ये या प्रकरणाने खळबळ माजली आहे. सरकारने निष्पक्षपणे या प्रकरणाची चौकशी करावी आणि जे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री आहेत त्यांनी याबाबतीत गांभीर्याने घ्यावे.कोणालाही वाचवण्यासाठी कोणाचा बळी देऊन तपासाची दिशा बदलू नये. या प्रकरणाची एसआयटी कडून चौकशी झाली तर आणि ती लवकर स्थापन झाली तर या प्रकरणातील पुरावे नष्ट केले जाणार नाहीत. आज जे दोषी आहेत ते चौकशी करत आहेत. त्यामुळे ही चौकशी पारदर्शकपणे होईल याची शक्यता नाही. महाराष्ट्रामध्ये महिला डॉक्टरांच्या बाबतीत अनेक वेळा अशा घटना घडतात. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ग्रह मंत्र्यांनी कठोर पाऊल उचलले पाहिजे. आज महाराष्ट्राची संस्कृती या सरकारमध्ये खूपच खालावली आहे. याची गांभीर्याने दखल गृहमंत्र्यांनी घेतली पाहिजे. या प्रकरणाची सकल चौकशी झाली आणि या मुलीच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला तरच आम्ही स्वस्थ बसू नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी काँग्रेसच्या नेत्या प्रणिती शिंदे यांनी दिला आहे. यावेळी त्यांच्या समवेत काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दामिनी पथकाची कॉफी शॉपवर कारवाई

बीड । प्रतिनिधी



ऐन दिवाळीच्या काळात दामिनी पथकाने कॉफी शॉप चेक करण्याची मोहीम सुरू केली आहे. आज दुपारी बीड शहर तसेच गेवराई मधे पेट्रोलिंग दरम्यान कॉफी शॉप चेक केले असता, कॉफी शॉप मधे गैरवर्तन करत असणाऱ्या ११ मुलांवर पोस्टे गेवराई येथे मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच जानेवारी २०२५ ते आज पावेतो विविध कॉफी शॉपवर एकूण ८४ प्रतिबंधात्मक केसेस करण्यात आलेल्या आहेत. तसेच शाळा, कॉलेज, क्लासेस व हॉस्टेलच्या बाहेर उभे राहून मुलींना त्रास देणाऱ्या इतर रोडरोमियोंवरही या अधिनियमानव्ये केसेस करण्यात आलेल्या आहे. अशा एकूण १६८ प्रतिबंधात्मक कारवाया मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०/११७ अन्वये करण्यात आल्या आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर , पोलीस हवालदार शोभा जाधव व पोलीस हवालदार अशोक शिंदे, पोलीस शिपाई उर्मिला म्हस्के सर्व नेमणूक दामिनी पथक बीड यांनी केली.

# डॉ.संपदा मुंडेंच्या आत्महत्या प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा व्हावी –कागदे

**बीड । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेली बीडची कन्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणातील दोषींना कठोरात कठोर शिक्षा देऊन संपदाला न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी युवा रिपाइं (आ) प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली आहे.



पप्पू कागदे म्हणाले, डॉ. संपदा मुंडे ही बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कवडगावसारख्या ग्रामीण भागातील होती. अतिशय हालकीच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत तिने डॉक्टर होण्याचे स्वप्न साकारले. अशा मेहनती, जिद्दी आणि सेवावृत्ती कन्येवर अन्याय झाला, हे समाजासाठी लज्जास्पद आहे.संपदा ही केवळ एक डॉक्टर नव्हती, तर ती अनेक मुलींसाठी प्रेरणास्थान होती. तिच्या आयुष्याचा अंत करण्यास कारणीभूत असणाऱ्यांना फाशीची शिक्षा मिळाली पाहिजे. महिलांवरील अत्याचार थांबवायचे असतील, तर अशा प्रकरणांमध्ये योग्य निर्णय होणे गरजेचे आहे. त्यांनी सरकारकडे मागणी केली की, या प्रकरणातील आरोपींवर जलदगती न्यायालयात खटला चालवावा, जेणेकरून संपदाला न्याय मिळेल. पप्पू कागदे यांनी इशारा दिला की, डॉ. संपदाला न्याय मिळाल्याशिवाय रिपाइं शांत बसणार नाही. आवश्यक असेल तर आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू. दरम्यान, या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रासह सर्वसामान्य जनतेत तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून समाजाने एकजुटीने संपदाला न्याय मिळवण्यासाठी पुढे यावे, अशी भावना पप्पू कागदे यांनी व्यक्त केली.

# लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मानाने होणार डॉ प्रल्हाद मुंडे, पत्रकार अनिल महाजन व सरपंच अमोल जगताप यांचा गौरव

किल्लेधारूर । प्रतिनिधी

क्रांती ग्रामविकास संस्था तथा विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन यांच्या वतीने लोकसंसद जन प्रेरणा शिखर पुरस्काराने धारूर येथील वैद्यकीय व्यावसायिक डॉ प्रल्हाद एस मुंडे पत्रकार अनिल महाजन व आदर्श गाव आवरगावचे सरपंच अमोल जगताप यांचा सन्मान २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे प्रमुख सुरेश यादव यांनी दिली आहे त्यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे





क्रांती ग्रामविकास संस्था तथा विश्वनायक लोकसंच फाउंडेशन यांच्या वतीने मुंबई येथे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा लोकसंसद जन प्रेरणा शिखर सन्मानाने राज्यस्तरावर २८ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाणचे सभागृह मुंबई येथे गौरव करण्यात येणार आहे यामध्ये धारूर येथील वैद्यकीय व्यावसायिक प्रल्हाद मुंडे पत्रकरीता व शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे अनिल महाजन व आदर्श गाव आवरगावचे सरपंच अमोल जगताप यांचा गौरव करण्यात येणार असून या कार्यक्रमास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार विविध मंत्री, विविध मान्यवर व सिने कलावंत उपस्थित राहणार आहेत या तिघांचा गौरव होणार असल्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे व त्यांचे अभिनंदन केले जात आहे यांना पुरस्कार त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी या संस्थेच्या वतीने देण्यात आल्याचे या संस्थेचे प्रमुख सुरेश यादव यांनी सांगितले.

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा म्हणजे विद्यालयाचा चालता बोलता जीवनपटच असतो –मा. आ. केशवराव आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २००५ च्या १० वी वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनीचा गेट-टुगेदर स्नेह मिलन मेळावा मा. आ. केशवराव आंधळे संस्कार शिक्षण मंडळाचे कार्यवाह यांच्या अध्यक्षतेखाली आणि अंजली आंधळे यांच्या कर्तव्यदक्ष नियोजनाने शतप्रतिशत संपन्न झाला.




याचा सविस्तर वृत्तांत असा की, २००५ मध्ये शिक्षण घेत असलेल्या महाराणी ताराबाई विद्यालयाच्या विद्यार्थिनींचा स्नेह मिलन मेळावा मा. आ. केशवराव आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली तर पंचायत समितीच्या माजी सभापती श्रीमती सुलोचनाताई केशवराव आंधळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक रोहिणी शिनगारे या विद्यार्थिनीने केले.तसेच रोहिणी शिंगारे ,अंजली मस्के, आम्रपाली मस्के, अश्विनी वखरे, या विद्यार्थिनींनी स्वागत पर गीत सादर केले . यावेळी विद्यार्थिनींनी शाळेच्या अनेक गमंती जमंती खेळाडू वृत्तीने व्यक्त केल्या .शाळेचे योगदान आमच्या जीवनात अनमोल असे आहे या शाळेने जे जे शिस्तीचे धडे ,गणिताचे पाढे आणि संस्काराचे बाळकडू दिले ते आजही आठवतात अशा प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या यामध्ये आम्रपाली मस्के ,स्वाती काळे ,रोहिणी वावदाने ,सीमा जाधव ,डॉ.रोहिणी अंकुशे ,उद्योजक आशा आळणे, सरिता माळवदे ,व प्रा.आगे स्वस्तीश्री यांनी शाळेबद्दलच्या भावना व्यक्त केल्या . यावेळी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य राऊत डी डी, धस यु एम ,श्री डोईफोडे आर.एस., उपप्राचार्य अशोक मस्के, श्रीमती जवंजाळ मॅडम ,श्रीमती फलके मॅडम व विद्यमान प्राचार्य श्रीमती शोभाताई आंधळे या उपस्थित होत्या त्यांनीही आपले विचार व्यक्त केले. श्री घोळवे डी.के ,श्री चोले बी पी हे शिक्षकही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. आ. केशवराव आंधळे यांनी विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी बोलताना त्यांच्याही शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला ते बोलताना म्हणाले मी शिक्षण घेत असताना होत असलेली मुलींच्या शिक्षणाची दुरावस्था सहन न झाल्यामुळेच मी वडवणी पान २ वर

# केज येथे पतसंस्था संचालक व कर्मचारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन –प्रा.आंधळे

केज । प्रतिनिधी

दिनांक २७- १० -२०२५ महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे अंतर्गत सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर व मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केज येथे पतसंस्थेचे संचालक व कर्मचारी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन शिक्षक सहकारी पतसंस्था केज या ठिकाणी बुधवार दिनांक २९ १० २०२५ ते ३० १० २०२५ या कालावधीत करण्यात आलेले आहे या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गास मा.आर. बी. कातळे साहेब सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज मा. प्राचार्य मनमथ हेरकर साहेब संचालक गजानन नागरी सहकारी बँक मर्यादित बीड मा.सी. ए. खोडसे साहेब प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड मा. एस. आर. कोळे साहेब उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर वरील तज्ञ मार्गदर्शक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.



केज तालुक्यातील नागरी, ग्रामीण, बिगर शेती, महिला,व पगारदार सहकारी पतसंस्था संचालक, कर्मचारी यांनी सदरील प्रशिक्षणास उपस्थित राहावे असे आवाहन सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर व बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# डॉ. संपदा मुंडे आत्महत्येप्रकरणी एसआयटी चौकशी व दोषींवर कठोर कारवाई करावी - प्रा. टी.पी. मुंडे

परळी वैजनाथ प्रतिनिधी

फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या आणि मूळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील डॉ. संपदा मुंडे या तरुणीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले असून, संबंधित प्रकरणी पोलिस अधिकारी तसेच एका खासदाराचे नाव पुढे आल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी केली आहे.



'डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये पोलिस अधिकारी गोपाळ बदने व प्रशांत बनकर यांच्यावर गंभीर मानसिक छळाचे आरोप केले आहेत. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली जावी, अन्यथा अशा घटना वैद्यकीय सेवेत कार्यरत महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे करतील, असे प्रा. मुंडे यांनी म्हटले आहे.

प्रा. मुंडे म्हणाले की, डॉ. संपदा मुंडे त्यांचे अकाली निधन अत्यंत दुःखद आहे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो तसेच तिच्या अकाली निधनाने कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात मी सहभागी आहे.या घटनेतील दोषींना कठोर शासन व्हावे. जर ती बीड जिल्ह्यातील पान २ वर

# प्रत्येक कणात असलेल्या शक्तीवर केवळ विश्वास ठेवला पाहिजे असे नाही तर ती ओळखली पाहिजे –साध्वी अदिती भारती





अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिव्य ज्योती जागृति संस्थेच्या वतीने सात दिवसीय श्रीमद देवी भागवत कथा ज्ञान यज्ञाचे आयोजन केले आहे . असंख्य भाविक मातेचे सुमधुर महिमा ऐकण्यासाठी योगेश्वरी महाविद्यालय प्रांगणात पोहोचले. दिव्य गुरु श्री आशुतोष महाराजजींच्या ब्रह्मज्ञानी शिष्यांनी सादर केलेली सुमधुर भजन हे लोकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र आहे. दुसऱ्या सत्रात कथाव्यास साध्वी अदिती भारती जी यांनी नैराश्य , विश्वाचे रहस्य आणि अर्जुनचा पणतू जनमेजया दुर्गमचा वध या कथांचे मनमोहक वर्णन केले.


माणसाला एक शाश्वत जगाचे रहस्य आणि या विश्वाचा निर्माता जाणून घ्यायची उत्सुकता असते . ही उत्सुकता प्रगतीचा आधार आहे. श्रीमद्? देवी भागवत महापुराणाच्या तिसऱ्या अध्यायात नमूद केल्याप्रमाणे साध्वीजींनी विश्वाचे स्पष्टीकरण दिले. आजचा शास्त्रज्ञ ज्या रहस्याचा शोध घेत आहे, त्या सत्याच्या संदर्भातून आपल्या ऋषीमुनी आणि तत्वज्ञानींनी सांगितले होते. वेदांच्या उदयाच्या वेळी, ते सर्व मानवजातीसमोर ठेवण्यात आले होते - एक तत्व जे संपूर्ण विश्वाचे नियंत्रण करते. एक शाश्वत शक्ती आहे आणि या शक्तीलाच माता भवानी असे संबोधले जाते. साध्वीजींनी शास्त्रांचा उल्लेख करून हे स्पष्ट केले. ऋषींचे हे अभिव्यक्ती केवळ श्रद्धा नव्हत्या , तर त्या शक्तीचे थेट दर्शन होते. आजकाल, सोशल मीडियावर, सनातनी म्हणण्याचा ट्रेंड सुरू आहे , साध्वीजींनी या घटनेद्वारे सांगितले की खरा सनातनी तो असतो जो फक्त आईवर विश्वास ठेवतो. तो त्यावर फक्त विश्वास ठेवत नाही तर त्याला ते माहित देखील आहे.

साध्वीजींनी सांगितले की, दिव्य गुरु श्री आशुतोष महाराजजी अनेकदा म्हणतात - आईवर विश्वास ठेवणे आणि तिला जाणून घेणे हा एक अधिकार आहे. साखर गोड आहे असे मानणे आणि ती खाणे यात जितका फरक आहे तितकाच फरक आहे. ब्रह्मा आणि शक्तीच्या एकतेचे वर्णन करताना, साध्वीजींनी शिव-शक्तीच्या अर्धनारीश्वर रूपाचा महिमा अधोरेखित केला. याद्वारे साध्वीजींनी समाजात प्रचलित असलेला लिंगभेद आणि बिघडत चाललेला लिंग गुणोत्तराचा मुद्दा अधोरेखित केला. त्याची महिमा आणि त्याचे आशीर्वाद वर्णन करताना साध्वीजी म्हणाल्या पान २ वर

# राष्ट्रीय महामार्ग असलेल्या धारूर घाटात नेहमीच वाहतूक ठप्प

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

पालखी मार्ग असणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ सी वरील धारूर आंबेडकर चौक ते धुनकवड पाटी या १२ कि मी. अरुंद रस्त्यामुळे धारूर घाटात नेहमीच वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार होत आहे यामध्ये राष्ट्रीय रस्ते विकास मंडळ व एम एस आर डी सी यांच्या वादामध्ये हा रस्ता रुद्रीकरण गेल्या अनेक वर्षा पासून रखडला असून याचा त्रास मात्र प्रवासी व वाहतूकदारांना सहन करावा लागत आहे त्यामुळे तात्काळ प्रशासनाने याकडे लक्ष देऊन या घाटाचे रुंदीकरण करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे. लोकप्रतिनिधी व नेत्यांनी श्रेयासाठी डांगोरा पिटण्यापेक्षा या रस्त्या रुंदीकरणाकडे लक्ष द्यावे अशीही मागणी होत आहे.





## प्रवाशी व वाहनधारक झाले बेजार; प्रशासनाचे दुर्लक्ष

धारूर ते तेलगाव हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग पालखी मार्ग ५४८ सी हा होऊन दहा वर्षाचा कालावधी होता आला तरीही धारूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते धुनकवड पाटी हा १२ किमी रस्ता अद्याप ही रुंदीकरण न झाल्याने व यामध्ये तीन किलोमीटर धारूर चा अवघड घाट असल्याने वाहतुकीस नेहमीत अडथळे होत आहेत. घाटामध्ये वाहतूक रखडणे व एखादे वाहन बिघडले किंवा अपघात झाला तर कित्येक तास वाहतूक ठप्प होण्याचे प्रकार हा नियमित चा खेळ झाल्याने सर्व वाहनधारक व या रोडने येणारे दहा ते पंधरा गावचे नागरिक बेजार होऊन गेले आहेत एम एस आर डी सी ने हा रस्ता करताना निकृष्ट दर्जाचा करून काम आटपले मात्र आता रस्ता रुंदीकरणाचा हा राष्ट्रीय महामार्ग खात्याकडे जात असल्याने दोन्ही विभागाच्या वादात त्या रस्त्याचे रुंदीकरण रखडत पडले आहे नेहमीच विविध नेते राष्ट्रीय महामार्ग मंत्र्याची भेट घेतलेले फोटो छापून व रस्ता होत असल्याचे दाखवून नागरिकांची दिशाभूल करत आहेत मात्र वाहतूक रखडणे व अपघात हे या रस्त्यावर नियमितचे झाले आहे राष्ट्रीय महामार्ग व एमएसआरडीसी यांच्यातील वाद हा निपटून तात्काळ या रस्त्याचे रुंदीकरण करावे व नागरिकांचा प्रश्न मार्गी लावावा नेहमीची अडचण दूर करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.२७ ऑक्टोबर २०२५ । पान ७

# प्राध्यापक भरती की सरकारी चेष्टा?

## ‘आंतरराष्ट्रीय जर्नल’च्या अटीमुळे हजारो उमेदवार भरतीतून बाहेर?

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्राध्यापक भरती लवकरच सुरू करण्याची घोषणा करून उमेदवारांच्या आशा पल्लवित केल्या खऱ्या, मात्र आता ‘आंतरराष्ट्रीय जर्नल्स’मधील शोधनिबंधांची जाचक अट लादून सरकारने हजारो उमेदवारांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. ऐन दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू होणार असताना, ही भरती प्रक्रिया जाणीवपूर्वक आचारसंहितेच्या कचाट्यात अडकवण्याची ही सरकारी व्यूहरचना असल्याची संतप्त शंका आणि तीव्र संताप उमेदवारांमधून व्यक्त होत आहे.

गेली अनेक वर्षे रखडलेली प्राध्यापक भरती सुरू होणार, या आशेवर असलेल्या उमेदवारांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नव्या अध्यादेशाने जोरदार धक्का दिला आहे. या भरती प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील जर्नल्समधील शोधनिबंधांसाठी तब्बल सहा गुण ठेवण्यात आले आहेत. ही अट म्हणजे



राज्यातील, विशेषतः ग्रामीण भागातील हुशार उमेदवारांवर सरळसरळ अन्याय असल्याची घणाघाती टीका होत आहे.

राज्यातील बहुतांश विद्यापीठांमध्ये अशा उच्चस्तरीय जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्यासाठी लागणारी यंत्रणा, मार्गदर्शन किंवा पायाभूत सुविधाच उपलब्ध नाहीत. त्यामुळे राज्यातील ९९ टक्क्यांहून अधिक उमेदवार या एका अटीमुळे भरती प्रक्रियेतून आपोआप बाहेर फेकले जाण्याची भीती आहे. प्राध्यापक होण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या उमेदवारांना प्रक्रियेपासून दूर ठेवणारी ही अन्यायकारक अट तत्काळ रद्द करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात कोल्हापुरातील एका कार्यक्रमात बोलताना खुद्द मंत्री चंद्रकांत पाटील यांनीच दिवाळीनंतर कोणत्याही क्षणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याचे स्पष्ट केले होते. जर आचारसंहिता इतक्या जवळ येऊन ठेपली आहे, तर मग प्राध्यापक भरती प्रक्रिया वेगाने राबवण्याऐवजी ती अधिक किचकट का केली जात आहे? असा थेट सवाल उमेदवार उपस्थित करत आहेत.


वित्त विभागाचे ‘झटके’ आणि मुख्यमंत्र्यांची कबुली..

सीओईपीमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच, उच्च शिक्षणाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी चंद्रकांत पाटील यांना वित्त विभागाचा दोनदा झटका बसला, अशी जाहीर कबुली दिली होती. त्यामुळे प्राध्यापक भरती करताना वित्त विभागाकडून तातडीने हिरवा कंदील मिळेल, याविषयी साशंकता आहे. तसेच, या अन्यायकारक अटींविरोधात प्राध्यापक संघटना आक्रमक झाल्या असून, त्यांनी या आदेशात तत्काळ सुधारणा करण्यासाठी थेट कुलपतींकडे दाद मागण्याची भूमिका घेतली आहे.

# पुणेकरांनो, हेल्मेट नाही घातलं तर थेट कारवाई, ५ महिन्यांत १३ हजार ४४९ जणांना ठोठावला दंड

***पुणे । प्रतिनिधी***

विना हेल्मेट तसेच मोबाईलवर बोलत दुचाकी चालविणे, जोरात वाहन चालविणे, विना सिटब्लेट यांसह वाहतुकीच्या नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांवर पुणे आरटीओच्या वायुवेग पथकाकडून कारवाई करण्यात येते. त्यानुसार मागील पाच महिन्यांत तब्बल ८ हजार ६३९ विना हेल्मेट वाहनचालकांवर कारवाई करण्यात आल्याचे आरटीओ प्रशासनाकडून सांगण्यात आले.पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) सामाजिक संस्थाच्या मदतीने रस्ता सुरक्षेसंदर्भात विविध उपक्रम राबविले जातात.



नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळण्याविषयी जनजागृती केली जात आहे. या माध्यमातून रस्ते अपघात कमी होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तरीही शहरात काही बेजबाबदार वाहनचालक सर्रासपणे वाहतुकीचे नियम मोडताना दिसतात. परिणामी अपघात, वाहतूक कोंडी या घटना वारंवार घडत आहे. विरुद्ध दिशने येणारी वाहने ही रस्ता अपघाताला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतात. त्यामुळे अशा वाहनांवर प्रामुख्याने कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सीट बेल्ट न घालणे, वेगाने वाहन चालविणे, हेल्मेट न घालणे, मोबाईलवर बोलत वाहने चालविणे अशा वाहनांवरही कारवाई केली जात आहे.

मागील पाच महिन्यांत १३ हजार ४४९ जणांवर कारवाई..

एप्रिल ते ऑगस्ट २०२५ दरम्यान पुणे आरटीओकडून सीट बेल्ट न घालणे, वेगाने वाहन चालविणे, हेल्मेट न घालणे, मोबाईलवर बोलत वाहने चालविणे अशा प्रकारच्या नियम तोडणाऱ्यांवर एकूण १३ हजार ४४९ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये सर्वाधिक विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्या ८ हजार ६३९ तर जोरात वाहन चालविणाऱ्या १ हजार ९९१ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

## आडते असोसिएशनची निवडणूक लागणार? अर्जावर १५ नोव्हेंबरपूर्वी निर्णय घेण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

मार्केट यार्ड येथील फळ-भाजीपाला विभागातील आडत्यांची संघटना असलेल्या श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड आडते असोसिएशनची निवडणूक धर्मादाय आयुक्त प्रतिनिधीच्या अधिपत्याखाली घेण्यावर १५ नोव्हेंबरपूर्वी निर्णय घ्यावा, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे व न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने दिला आहे. पुणे विभागाचे सहायक धर्मादाय आयुक्त प्रथमेश भोसले यांना हा आदेश दिला आहे. भोसले यांच्या समोर दोन्ही बाजूंची म्हणणे दाखल करण्यात आले आहे. यावर मंगळवारी (दि.२८) सुनावणी होणार आहे. या दिवशी निवडणूक घेण्याचा आदेश देणार का नाही, याकडे आडत्यांसह बाजार घटकांचे लक्ष लागले आहे.



आडते असोसिएशनची निवडणूक दर ३ वर्षांनी होत असते. डिसेंबर २०२४ मध्ये मुदत संपल्याने निवडणूक होणे अपेक्षित होते. निवडणूक घेण्यासाठी विलास भुजबळ आणि आपासाहेब खिरीड यांनी येथील धर्मादाय कार्यालयात अर्ज केला होता. मात्र, विविध कारणांनी सुनावणीस विलंब होत असल्याने माजी उपाध्यक्ष अमोल घुले याच्या मार्गदर्शनाखाली दोघांनी ॲड. राहुल कदम यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती यामध्ये आडते असोसिएशनची निवडणूक धर्मादाय आयुक्त प्रतिनिधीच्या अधिपत्याखाली घ्यावी, अशी मागणी करण्यात आले होती. यावर सुनावणी करत उच्च न्यायालयाने १५ नोव्हेंबर पर्यंत निर्णय घेण्याचा आदेश सहाय्यक धर्मादाय आयुक्तांना दिला आहे.

## एकाच आठवड्यात तीन वेळा नदीत राडारोडा! पुण्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेला असलेल्या सलग सुट्ट्यांचा गैरफायदा घेत शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या नदीपात्रात राडारोडा टाकण्याचे प्रकार सुरूच आहेत. काही दिवसांपूर्वी भिडे पुलाच्या परिसरात राडारोडा टाकण्यात आला होता आता ओकारेश्वर मंदीराच्या मागील बाजूस धोबीघाट समोर तीन ते चार ट्रक राडारोडा टाकण्यात आला आहे. दिवाळी तसेच पाच दिवसांच्या आठवड्यामुळे महापालिकेस सलग नऊ दिवसांची सुट्टी आहे. त्यामुळे, राडारोडा टाकल्यास कारवाई होणार नाही तसेच लक्षातही येणार नाही याची दक्षता घेत मोठ्या प्रमाणात हा राडारोडा टाकला जात आहे.

शहरात निर्माण होणारा राडारोडा परस्पर विल्हेवाट न लावता त्यावर प्रक्रीया करण्य़ासाठीमहापालिकेकडून वाघोली येथे प्रक्रीया प्रकल्प उभारलेला आहे. त्यानुसार, बांधकाम व्यावसायिकांना असा राडारोडा महापालिकेच्या प्रकल्पावर देणे बंधनकारक आहे. तसेच, हा राडारोडा महापालिकेस न देता सार्वजनिक ठिकाणी, नदी, नाले, टेकड्या तसेच रस्त्यांकडेला टाकल्यास पालिकेकडून दंड आकारला जातो. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयस्तरावर दक्षता पथके नेमण्यात आली आहेत. मात्र, त्यानंतरही असे प्रकार सर्रास सुरू आहेत. त्यामुळे, भराव पडत असून नदीपात्र अरूंद झाल्याने पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत आहे. विशेष म्हणजे एकाच आठवड्यात तीन वेळा राडारोडा वेगेवेगळ्या भागात टाकण्याचे प्रकार घडलेले असतानाही महापालिकेकडून हा राडारोडा उचलला जात आहे. मात्र, संबंधितांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केली जात आहे.

## फुरसुंगी–उरुळीतील मतदार यादीत गोंधळ

**फुरसुंगी । प्रतिनिधी**

फुरसुंगी-उरुळी देवाची नगर परिषदेसाठी जाहीर करण्यात आलेल्या मतदार यादीमधील गोंधळ कायम आहे. उरुळी देवाची गावातील प्रभाग क्र. १६ मध्ये एकाच पत्त्यावर ३१ विविध जाती-धर्मातील मतदारांची नावे आढळून आली आहेत. याप्रकरणी हरकत नोंदविण्यात आली असून संबंधित बोगस नावे कमी केली गेली नाही तर तीव्र जनआंदोलन छेडू, असा इशारा शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख व माजी सरपंच उल्हास शेवाळे यांनी दिला आहे.

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीमध्ये नाव, पत्ता व प्रभागांमध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे येथील रहिवाशांनी १८ हजार २३४ हरकती दाखल केल्या आहेत. ९ ऑक्टोबरला प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप मतदारयादीमध्ये एकाच घरातील मतदारांची नावे विविध प्रभागात आढळून आली आहेत.

मोठ्या संख्येने दुबार व स्थलांतरितांची नावे यादीत समाविष्ट आहेत, काही ठिकाणी दोन प्रभागांच्या लोकसंख्येतही मोठी तफावत पाहायला मिळत आहे. काही मतदारांची नावे यादीत सापडली नाहीत. नाव, पत्ता, फोटो



यामध्येही अनेक चुका आढळून आलेल्या आहेत.

सद्यस्थितीत प्रशासनाकडून या हरकती निवारण करण्याचे काम सुरू असून ३१ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तरी, प्रशासनाने तातडीने मतदारयादी दुरूस्त करून बोगस नावे कमी करावीत, अशी मागणी शेवाळे यांनी केली आहे.

अन्यथा आंदोलन.. ‘प्रारुप मतदारयादीत उरुळी देवाची गावातील प्रभाग क्र. १६ मध्ये एका ठिकाणी एकाच पत्त्यावर ३१ विविध जाती धर्मातील मतदारांची नावे आली आहेत, ही नावे बोगस असून या पत्त्यावर या नावांचे कोणतेही मतदार राहत नाही याची आम्ही खात्री केली आहे, तरी प्रशासनाने ही बोगस नावे यादीतून कमी करावीत अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारला लागेल.’

# रवींद्र धंगेकरांचं थेट पंतप्रधान मोदींना पत्र, मुरलीधर मोहोळांचा उल्लेख करत केली मोठी मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील जैन बोर्डिंग होस्टेलच्या** ३.५ एकर जमीन वादाने राजकीय वातावरण तापले आहे. एकनाथ शिंदे गटाचे शिवसेना नेते आणि माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा राजीनामा घ्यावा आणि जैन बोर्डिंगचा बेकायदेशीर जमीन व्यवहार रद्द करावा, अशी मागणी केली आहे.

यासोबतच, धंगेकर यांनी २७ ऑक्टोबर २०२५ पासून जैन बोर्डिंग येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. या पत्राची प्रत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना पाठवण्यात आली आहे. धंगेकर यांनी पत्रात म्हटले आहे, गेल्या १८ दिवसांपासून आम्ही



पुरावे सादर केले आहेत की, हा व्यवहार मोहोळ यांच्याशी संबंधित व्यक्ती आणि संस्थांमार्फत झाला. मोहोळ यांच्या मंत्रिपदाच्या प्रभावाखाली हा गैरव्यवहार घडला आहे, त्यामुळे ते पदावर असताना निष्पक्ष चौकशी अशक्य आहे. शिवाजीनगरातील मॉडेल कॉलनी येथील सेठ हीराचंद नेमचंद जैन बोर्डिंग हाऊसची ३.५ एकर जमीन जैन ट्रस्टच्या ताब्यात आहे, जी विद्यार्थी वसतिगृह, जैन मंदिर आणि सामाजिक कार्यासाठी वापरली जाते. डिसेंबर २०२४ मध्ये ट्रस्ट विश्वस्तांनी ही जमीन गोखले कन्स्ट्रक्शनला विकण्याचा निर्णय घेतला, जो ८ ऑक्टोबर २०२५ रोजी २३० कोटींना अंतिम झाला. धंगेकर यांनी हा व्यवहार बेकायदेशीर असल्याचा दावा केला आहे, कारण ही जमीन दानधर्मासाठी आहे आणि व्यावसायिक विक्री धर्मादाय कायद्याचे उल्लंघन करते. त्यांनी मोहोळ यांच्यावर गोखले बिल्डर्सशी भागीदारी आणि धर्मादाय आयुक्तांवर दबाव टाकल्याचा आरोप केला आहे.

धंगेकरांनी मोदींकडे काय केली मागणी?

रवींद्र धंगेकर यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात या मागण्या मांडल्या आहेत. शिवाजीनगरातील ३.५ एकर जैन बोर्डिंग जमीन बेकायदेशीरपणे गोखले कन्स्ट्रक्शन कंपनीला विकण्यात आली. हा व्यवहार रद्द करावा. केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी पदाचा गैरवापर करून धर्मादाय आयुक्तांवर दबाव टाकला, असा आरोप आहे. निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी राजीनामा द्यावा.

जैन बोर्डिंग आणि इतर मंदिर व देवस्थानच्या जमिनी हडपणाऱ्या टोळीवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमावी. २७ ऑक्टोबरपासून जैन बोर्डिंग परिसरात पुणेकरांसह बेमुदत धरणे आंदोलन सुरू करणार, जोपर्यंत व्यवहार रद्द होत नाही तोपर्यंत.

# आता अजित पवारांना भाजपचा धक्का : माजी आमदार करणार बुधवारी पक्षप्रवेश

**शेळगाव । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथील रहिवासी व सोलापूर जिल्हातील मोहोळ विधानसभा मतदारसंघांचे माजी आमदार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अतिशय घनिष्ठ निकटवर्ती माजी आमदार यशवंत विठ्ठल माने यांनी अजित पवार यांची साथ सोडली आहे, ते बुधवारी( दि २९ मुंबई येथे भाजप पक्ष प्रवेश करणार आहेत.

माजी आमदार यशवंत माने हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापने पासून पक्षाबरोबर व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सोबत असून अजित पवार यांचे निकटवर्ती म्हणून माने यांची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सन २०१३ ते २०१६ दरम्यान पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यानंतर त्यांनी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे ताब्यातील इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सन २०१६ मध्ये हिसकावून घेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता खेचून




आणली. त्या बाजार समिती मध्ये सन २०१६ ते सन २०२१ पर्यत त्यांनी उपाध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले.सन २०२१पासून संचालक म्हणून काम पाहात आहेत. सन २०१९ मध्ये एकत्रित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यशवंत माने यांना मोहोळ विधानसभा मतदारसंघात तिकिटे दिले. त्या निवडणूकित माने हे २२ हजाराहून अधिक मतांनी ते विजयी झाले. सन २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विभाजन झाल्यानंतर यशवंत माने हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सोबत गेले. सन २०२४ मध्ये यशवंत माने यांना पुन्हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोहोळ विधानसभा मतदारसंघात उमेदवारी दिली. मात्र निवडणूकीमध्ये त्यांचा पराभव झाला. पक्षातील अंतर्गत कुरघोडीमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मला मागील पाच वर्षात ३५०० हजार कोटींहून अधिकाचा विकास निधी दिला. त्याबद्दल मी अजित पवार मनापासून आभारी आहे.

## एसटी चालकांनो सावधान! आता प्रत्येक फेरीपूर्वी होणार ‘ही’ तपासणी, प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

दिवाळी सण साजरा करून शहरात परतणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने अशा प्रवाशांना सुखकर आणि सुरक्षित प्रवास करता यावा, कोणतीही अनुचीत घटना घडू नये यासाठी चालक-वाहकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी केली जात असल्याचे पुणे एसटी प्रशासनाकडून सांगण्यात आले.एसटी महामंडळाच्या ताफ्यातील सर्व बसचालकांची प्रत्येक फेरीपूर्वी अल्कोहोल तपासणी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात खासगी ठेकेदारांच्या शिवशाही, शिवनेरी बसे भाडेतत्त्वावर चालविल्या जातात. या गाड्यांना चालक पुरवण्याचे



कामही ठेकेदारच करतात. यावर महामंडळाने अशा सर्व चालकांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. गतवर्षी एका शिवनेरी बसवरील चालक मद्यपान करून बस चालवत असल्याचा प्रकार समोर आला. हा चालक ठेकेदाराकडील होता. त्यानंतर गतवर्षी महामंडळाच्या कारभारावर प्रचंड टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर दिवाळीमध्ये चालक-वाहक ड्यूटीवर आल्यावर मद्यपानाची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात येत आहे. पुणे विभागातील स्वारगेट आणि शिवाजीनगर आगारासह जिल्ह्यातील सर्व आगारांतील चालक-वाहकांची अल्कोहोल तपासणी करण्यात येत आहे, चालक-वाहक गाडीत बसण्याअधीच अशी तपासणी केली जाते, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

# मुंबई ड्रग्ज प्रकरणातील फरार आरोपीला बारामतीत अटक

**बारामती । प्रतिनिधी**

मुंबईतील ५० लाखांच्या एमडी ड्रग्ज प्रकरणातील फरार आरोपीला बारामती तालुका पोलिसांनी कारवाई करत गजाआड केले आहे. समीर ऊर्फ नूर मोहम्मद अस्लम शेख (वय २०, रा. वसई) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, तुळींज पोलिस ठाणे, नालासोपारा (ईस्ट), मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयात दि. १४ सप्टेंबर रोजी एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत तसेच अन्य कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपी नामे शहबाज हमीद शेख, योगेश राजू राठोड, जफर आसिफ शेख, बाबू शेख आणि समीर शेख यांच्याविरुद्ध कारवाई सुरू होती.

यापैकी समीर ऊर्फ नूर मोहम्मद




अस्लम शेख (वय २०, रा. वसई) हा फरार असून, बारामती परिसरात असल्याची माहिती वसई- विरार पोलिस आयुक्तालयातील पोलिसांनी बारामती तालुका पोलिसांना दिली होती. पथकाने शोधमोहीम राबवत तो बारामती शहरात वास्तव्यास असून, ‘बँड रिव्हर’ या कपड्याच्या दुकानात काम करतो अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

यानंतर पोलिसांनी हुशारीने आखलेल्या योजनेनुसार पथकाने पाहणी करत आरोपीची ओळख पटवली आणि क्षणाचाही विलंब न करता त्याला ताब्यात घेतले. बारामती पोलिस ठाण्यात चौकशीदरम्यान त्याने तुळींज पोलिस ठाण्यातील गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे कबूल केले. तत्काळ मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयास माहिती देऊन आरोपीस त्यांच्या ताब्यात पुढील तपासासाठी सुपूर्त करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल, अप्पर पोलिस अधीक्षक गणेश बिराजदार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, सहाय्यक पोलिस निरीक्षक विक्रम पवार, सहाय्यक फौजदार सुरेंद्र वाघ, सुरेश बडे, आणि पोलिस अंमलदार नीलेश वाकळे, राहुल लांडगे यांच्या पथकाने केली. शेख याला मीरा भाईंदर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.